# प्रकरण सहावे
# निष्कर्ष आणि
# शिफारशी

# प्रकरण सहावे.

## विभाग "अ"

### निष्कर्ष

६.०१ प्रास्ताविक.

६.०२ मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयक निष्कर्ष

६.०३ प्राथमिक शाळांच्या माहिती संदर्भात निष्कर्ष.

६.०४ कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक निष्कर्ष.

६.०५ प्राथमिक शाळांच्या शिक्षकांविषयी निष्कर्ष.

६.०६ विद्यार्थ्यांविषयी निष्कर्ष.

६.०७ भौतिक सुविधा व शालेय परिसर विषयक निष्कर्ष.

६.०८ केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष.

६.०९ शिक्षण विस्तार अधिका-यांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष.

६.१० गटशिक्षणाधिका-यांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीवरून काढलेले निष्कर्ष.

६.११ प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातील निष्कर्ष.

## विभाग "ब"

### शिफारशी.

६.१२ मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहितीविषयक शिफारशी.

६.१३ प्राथमिक शाळांच्या माहिती संदर्भात शिफारशी.

६.१४ कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तराविषयी शिफारशी.

६.१५ प्राथमिक शाळांच्या शिक्षकांविषयी शिफारशी.

६.१६ विद्यार्थ्यांविषयी शिफारशी.

६.१७ भौतिक सुविधा व शालेय परिसरासंबंधी शिफारशी.

६.१८ केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीद्वारे मिळालेल्या माहितीद्वारे शिफारशी.

६.१९ शिक्षणविस्तार अधिका-यांच्या मुलाखतीतील माहिती विषयक शिफारशी.

६.२० गटशिक्षणाधिका-यांच्या माहितीविषयक शिफारशी.

६.२१ प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणावरून मिळालेल्या माहितीद्वारे केलेल्या शिफारशी.

विभाग "क"

<u>पुढील संशोधनासाठी विषय.</u>

६.२२ माध्यमिक शाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२३ कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२४ वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२५ तालुक्यातील विनाअनुदानित माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२६ तालुक्यातील निवासी आश्रमशाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

६.२७ तालुक्यातील साखर शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.

# प्रकरण सहावे.

## निष्कर्ष आणि शिफारशी.

### ६.0१ प्रास्ताविक.

संशोधनाच्या प्रकरण १ ते ४ मध्ये प्राथमिक शाळांच्या प्रशासनाचा आढावा घेतला आहे. वरील प्रकरणे तात्विक स्वरूपाची आहेत. प्रकरण ५ मध्ये मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षणविस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीच्या प्रतिसादातून आणि पंचवीस प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण आणि विशदीकरण केले आहे. पाचव्या प्रकरणाच्या आधारे या प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविण्यात आले आहेत.

### ६.0२ मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयक निष्कर्ष.

१. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या प्रतिसादक मुख्याध्यापकांत एस.एस.सी.डी.एड. असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३३.३३% होते. एस.एस.सी.ज्यू.ट्रेंड असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १५.१५ होते. एस.एस.सी.सि.ट्रेंड असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १३.६४% होते.

२. ज्यु.पी.टी.सी. असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ७.५७% होते.

३. प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक पदवीधर व प्राथमिक पदवीधर प्रशिक्षित असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ६.0६% होते.

४. प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक पदवीधर व शा.शिक्षण प्रशिक्षीत (बी.ए.बी.पी.एड्) असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३.0३% होते.

५. प्राथमिक शाळांमध्ये उच्च पदवीधर डी.एड् (एम.ए.डी.एड्) असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३.0३% होते.

६. प्राथमिक शाळांमध्ये उच्च पदवीधर व प्रशिक्षित (एम.ए.बी.एड्) असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण १.५२% होते.

७. प्राथमिक शाळांचे प्रभारी म्हणून काम पाहणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३९.३९% होते.

८. प्राथमिक शाळांचे कायमस्वरूपी मुख्याध्यापक म्हणून (प्रमोशन) काम पाहणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ६०.६१% होते.

९. मुख्याध्यापक पदाचा सरासरी अनुभव ८ वर्षे दिसून आला.

१०. तीन वर्षापर्यन्त प्रशासनाचा अनुभव आहे असे ४८.४८% मुख्याध्यापक आढळून आले.

११. २८.७८% मुख्याध्यापकांना प्रशासनाचा पाच वर्षापर्यन्तचा अनुभव होता.

१२. ८ वर्षापर्यन्त प्राथमिक शाळेच्या प्रशासनाचा अनुभव असणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३७.८९% होते.

१३. १५.१५% प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकांना आठ वर्षाच्या पुढे अनुभव होता.

## ६.०३ प्राथमिक शाळांच्या माहितीसंबंधी निष्कर्ष.

१. माळशिरस तालुक्यातील १६.६७% प्राथमिक शाळा शहरी भागात मोडतात.

२. ग्रामीण भागात असलेल्या प्राथमिक शाळांचे प्रमाण ८३.३३% होते.

३. ग्रामीण भागात जास्त प्राथमिक शाळा असल्याचे आढळून आले.

४. माळशिरस तालुक्यात मिश्र प्राथमिक शाळांचे प्रमाण ९३.९४% होते.

५. फक्त मुलींची प्राथमिक शाळा असण्याचे प्रमाण ३.०३% होते.

६. ३.०३% प्राथमिक शाळा फक्त मुलांसाठी होत्या.

७. मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र शाळा असण्याचे प्रमाण सारखे व अत्यल्प होते.

८. माळशिरस तालुक्यात कनिष्ठ प्राथमिक शाळांचे प्रमाण २४.२४% होते. वरिष्ठ प्राथमिक शाळांचे प्रमाण ७२.७३% होते. ३.०३% शाळा प्राथमिक व माध्यमिक या एकत्र स्वरूपात होत्या.

९. माळशिरस तालुक्यात प्राथमिक ते माध्यमिक पर्यन्त एकत्रित असणा-या शाळांचे प्रमाण कमी होते.

१०. माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणा-या प्राथमिक शाळांचे प्रमाण ९०.९१% होते. तर खाजगी संस्थामार्फत चालविल्या जाणा-या शाळांचे प्रमाण ९.०९% होते.

११. नगरपालिका नसल्यामुळे एकही शाळा त्या वर्गात मोडली नव्हती.

१२. माळशिरस तालुक्यात जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणा-या प्राथमिक शाळांचे प्रमाण सर्वात जास्त व खाजगी संस्थामार्फत चालविल्या जाणा-या प्राथमिक शाळांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे आढळून आले.

१३. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये अध्यापन करणा-या शिक्षकांमध्ये पुरूष शिक्षकांचे प्रमाण ६९.६७% होते.

१४. माळशिरस तालुक्यामध्ये प्राथमिक शाळांमध्ये स्त्री शिक्षकांचे प्रमाण ३०.३३% होते.

१५. स्त्री शिक्षकांचे प्रमाण पुरूष शिक्षकांच्या प्रमाणापेक्षा तुलनेत कमी होते.

१६. माळशिरस तालुक्यात प्राथमिक शाळांमध्ये कार्यालयीन कर्मचारी - लिपिक असणा-या शाळांचे प्रमाण ६.०६% होते.९.०९% शाळांना शिपाई होते.

१७. प्राथमिक शाळेत लिपिक व सेवक संख्या अत्यंत कमी आहे असे अढळून आले.

१८. माळशिरस तालुक्यातील शाळांमध्ये कार्यालयीन कर्मचारी आवश्यक आहेत असे म्हणणा-या शाळांचे प्रमाण ८१.८२% होते. १८.१८% शाळा मुख्याध्यापकांनी कार्यालयीन कर्मचा-यांबद्दल नकार दिला.

१९. प्राथमिक शाळांना कार्यालयीन कर्मचारी (लिपिक/सेवक) असायला हवा म्हणणा-या शाळांचे प्रमाण जास्त होते.

२०. माळशिरस तालुक्यात प्राथमिक शाळांना स्त्री शिक्षकांची आवश्यकता आहे असे म्हणणा-या शाळा मुख्याध्यापकांचे प्रमाण ६९.७०% होते. ३०.३०% मुख्याध्यापकांनी प्राथमिक स्तरावर स्त्री शिक्षकांच्या आवश्यकतेबद्दल नकार दिला.

२१. प्राथमिक शाळांमध्ये स्त्री शिक्षकांची गरज आहे म्हणणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण जास्त आढळले.

## ६.०४ कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक निष्कर्ष.

१. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांतील शिक्षकांसाठी दप्तर जिल्हा परिषद ३०.३१% शाळांना पुरविते. ४२.४२% शाळा सादीलचा उपयोग दप्तर खरेदीसाठी करतात. २४.२४% शाळा सादील व जिल्हा परिषद या दोन्ही माध्यमातून दप्तराची गरज भागवितात. ३.०३% शाळांना जिल्हा परिषद व सादील यापैकी कोणीही दप्तर पुरवित नाही.

२. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांतील प्रत्येक वर्गाची हजेरी घेणा-या शिक्षकांचे प्रमाण १००% आहे असे दिसून आले.

३. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये ९६.९६% शिक्षक गैरहजर मुलांच्या पालकांच्या भेटी घेतात. ३.०४% शिक्षक गैरहजर मुलांच्या पालकांना भेटत नाहीत असे दिसून येते.

४. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळेतील १००% शिक्षक हे महिना अकेरीस मुख्याध्यापकांची स्वाक्षरी घेतात असे आढळून आले.

५. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये लेट येणा-या शिक्षकांसाठी "लेट मस्टर" न ठेवणा-यांचे प्रमाण १५.१५% असल्याचे दिसून आले.

६. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये १००% शाळा विहीत नमून्यात वेळापत्रक ठेवतात असे दिसून आले.

७. प्राथमिक शाळांमध्ये येणारी मासिके, पुस्तके यांच्या स्वतंत्र नोंदी १००% शाळांमध्ये ठेवल्या जातात.

८. प्राथमिक शाळांमध्ये वर्षभरात ज्या किरकोळ दुरूस्त्या केल्या जातात त्या लोकवर्गणीतून करणा-या शाळांचे प्रमाण ३३.३३% आहे. सादील मधून किरकोळ दुरूस्ती करणा-या शाळांचे प्रमाण २१.२१% आहे. शैक्षणिक उठाव (देणग्या) यातून किरकोळ दुरूस्ती करणा-या शाळांचे प्रमाण ६९.६९% आहे.

९. प्राथमिक शाळांमध्ये तपासणी अधिका-यांसाठी १00% शाळा नोंदवही ठेवतात असे आढळून आले.

१0. प्राथमिक शाळा दप्तार तपासणी वेळी १00% तपासणी अधिकारी सूचना देतात असे आढळून आले.

११. प्राथमिक शाळांमध्ये १00% मुख्याध्यापक दाखला दिल्यानंतर स्वत: नोंदी तपासून पाहतात असे दिसून आले.

१२. ग्रामशिक्षण समितीच्या बैठकीच्या अहवाल नोंदी ९६.९६% प्राथमिक शाळेत ठेवतात. ग्रामशिक्षण समितीच्या बैठकीचा अहवाल नोंदी न ठेवणा-या शाळा ३.0४% आहेत.

१३. प्राथमिक शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत ठेवणा-या शाळांचे प्रमाण १00% होते.

१४. प्राथमिक शाळांना मिळणारे ४% अनुदान यांच्या खर्चाच्या नोंदी ठेवणा-या शाळांचे प्रमाण १00% आढळून आले.

१५. शासनाकडून मिळणारे अनुदान पुरेसे आहे असे म्हणणारे मुख्याध्यापक ८७.८७% आहेत.

१६. अनुदान पुरेसे नाही असे १२.१३% मुख्याध्यापकांना वाटते.

१७. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये पुढील प्रमाणे फाईल्स व रजिस्टरची उपलब्धता होती.

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रवेश अर्ज फाईल | १00% |
| ब. | शेरे पुस्तक | १00% |
| क. | परिपत्रक फाईल | ४५.४५% |
| ड. | लॉग बुक | १00% |
| इ. | हालचाल नोंद वही | ७५.७५% |
| ई. | आरोग्य तपासणी वही | ३१.८१% |
| फ. | दाखला फाईल | १00% |

स. १९८६ ची धोरण पुस्तिका ९३.९३%

फ. १९९५ क्षमता अभ्यासक्रम ९६.९६%

म. जीवन शिक्षण अंक ९३.९५%

१८. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी प्राथमिक शिक्षण विषयक राबविल्या जाणा-या योजनांचे प्रमाण पुढील प्रमाणे स्पष्ट केले.

अ. गणवेश वाटप ९०.९०%

ब. पुस्तक पेढी ९३.९३%

क. लेखन साहित्य ८१.७८%

ड. उपस्थिती भत्ता ८९.८९%

इ. शालेय पोषण आहार १००%

ई. सावित्रीबाई दत्तक पालक ९०.९०%

फ. अपंग कल्याण ६३.९३%

## ६.०५ प्राथमिक शाळांच्या शिक्षकांविषयी निष्कर्ष.

१. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांमध्ये मान्य पदानुसार शिक्षक प्रमाण आहे अशा शाळांचे प्रमाण ३०.३०% आहे.

२. मान्य पदापेक्षा कमी शिक्षक प्रमाण आहे असे ६९.६९% मुख्याध्यापकांचे मत होते.

३. माळशिरस तालुक्यात ५ ते ८ इयत्तांसाठी पदवीधर शिक्षक मान्य शाळा प्रमाण ६९.६९% होते.

४. मान्य पदवीधर शिक्षकापैकी रिक्त पदे असणा-या शाळांची संख्या १४ आहे.

५. १००% शाळांत घटक नियोजन व वार्षिक नियोजन ठेवतात असे दिसून आले.

६. प्राथमिक शाळांमधील सर्व शिक्षक पाठ टाचण काढतात.

७. प्राथमिक शाळांमधील ९३.९३% मुख्याध्यापक वर्गशिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करतात.

८. महिन्यातून दोनवेळा पाठ निरीक्षण करणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ७५.७५% आहे

९. महिन्यातून तीनवेळा पाठ निरीक्षण करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण १८.१८% आहे.

१०. ९.०७% मुख्याध्यापक महिन्यातून चारवेळा शिक्षकांचे पाठ निरीक्षण करतात.

११. प्रतिसादक मुख्याध्यापक शिक्षकांचे पाठ निरीक्षण करीत असताना खालील बाबी लक्षात घेतात.

अ) घटकाचे पूर्व ज्ञान, अध्यापन पद्धती, निवडलेली शैक्षणिक साधने, विषयाची तयारी व त्यावरील प्रभुत्व पाहिले जाते.

ब) पाठ नियोजन/पाठ टाचण पाहिले जाते.

क) फलक लेखन, भाषा कौशल्य, प्रश्न कौशल्य, प्रबलन कौशल्य व त्यात विद्यार्थ्यांचा सहभाग पाहिला जातो.

ड) अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पाहिली जातात.

इ) विद्यार्थ्यांची उपस्थिती, पाठ पायऱ्यांप्रमाणे स्वाध्याय प्रसंगावधान व अभिनय पाहिले जाते.

१२. पाठ निरीक्षण केल्यानंतर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण सर्वात जास्त ५४.५४% आहे.

१३. तोंडी सूचना व लेखी सूचना देणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण ३१.३२% होते तर प्रशंसा करणाऱ्या मुख्याध्यापकांचे प्रमाण १३.१४% होते.

१४. प्राथमिक शाळांच्या शिक्षकांसाठी पाठ घेण्याचे मुख्याध्यापकांचे प्रमाण खालील प्रमाणे होते.

| | | |
|---|---|---|
| अ) | दोन वेळा | ६.०६% |
| ब) | तीन वेळा | ५०% |
| क) | चार वेळा | २५.७५% |
| ड) | कधीही नाही | १८.१९% |

१५. प्राथमिक शाळांचे शिक्षक अध्यापन करताना शैक्षणिक साधनांचा वापर करणा-यांचे प्रमाण ९३.९३% आहे.

१६. शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साधनांचा वापर करत नाहीत हे मत ६.0७% मुख्याध्यापकांचे आहे.

१७. शैक्षणिक साधनांचा वापर अध्यापनात करणा-या शिक्षकांचे प्रमाण जास्त (९३.९३%) होते.

१८. वेळेत अभ्यासक्रम पूर्ण झाला नाही तर खालील उपाय शाळेतील शिक्षक करीत होते.

अ) जादा तास. १00%

ब) स्वयं अध्ययन. १५.१५%

क) गट अभ्यास. ४.५५%

१९. ५७.८७% मुख्याध्यापकांचे मते शिक्षक मुख्यालयास राहतात. १२.१३% मुख्याध्यापकांच्या मते शिक्षक मुख्यालयास रहात नाहीत.

२0. १00% मुख्याध्यापकांच्या मते शिक्षकांची मासिक सभा घेतली जाते असे दिसून आले.

२१. शिक्षकांच्या मासिक सभेत खालील विषयांचा आढावा घेतला जातो.

अ) परिपत्रक वाचन. (६६)

ब) शालेय अध्ययन-अध्यापन आढावा. (५८)

क) दिग्दर्शित पाठ घेतला जातो. (६६)

ड) शिक्षकांच्या शालेय व शैक्षणिक अडचणीवर चर्चा करणे. (६६)

इ) शिक्षकांना मार्गदर्शन केले जाते. (६६)

ई) सांस्कृतिक कार्यक्रम घेतला जातो. (५८)

२२. १00% प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षणासाठी पाठविले होते.

२३. शिक्षकांना खालील प्रशिक्षणासाठी पाठविले जाते असे मुख्याध्यापकांनी सांगितले.

अ) सेवांतर्गत प्रशिक्षण. (६६)

ब) S.C.E.R.T. ची प्रशिक्षणे. (४२)

क) सेवापूर्व प्रशिक्षण. (१८)

ड) N.C.E.R.T. ची प्रशिक्षणे. (२४)

२४. शिक्षण प्रशिक्षणास गेल्यावर त्याचे शाळेच्या दैनंदिन कामकाजावर होणारे दुष्परिणाम खालील प्रमाणे सांगितले.

अ) त्यांचा वर्ग रिकामा पडतो. (६६)

ब) विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होते. (५४)

क) हा वर्ग इतर वर्गाला जोडला जातो. (६६)

ड) विद्यार्थ्यात आपले गुरूजी गेल्यामुळे नैराश्य निर्माण होते. (४१)

२५. प्राथमिक शिक्षक शाळेतील विज्ञान साहित्य वापरतात हे मत मांडणा-या मुख्याध्यापकांचे प्रमाण ८0.३१% आहे.

२६. १९.६९% मुख्याध्यापकांचे मते शाळेतील विज्ञान साहित्य वापरले जात नाही.

## <u>६.0६ विद्यार्थ्यांविषयी निष्कर्ष.</u>

१. ७८.७८% मुख्याध्यापक उशिरा येणा-या विद्यार्थ्यांना शिक्षा करतात असे दिसून आले. २१.२२% मुख्याध्यापकांचे मते विद्यार्थ्यांना शिक्षा करीत नाहीत.

२. प्रतिसादक मुख्याध्यापक विद्यार्थ्यांना पुढील प्रमाणे शिक्षा करतात असे दिसून येते.

अ) विद्यार्थ्यांचे उशिरा येण्यामागचे कारण जाणून घेतले जाते. (४४)

ब) उशिरा येण्यामुळे कोणते नुकसान होते ते समजावून सांगितले जाते. (३३)

क) शारीरिक शिक्षा (दंड, बागकाम, कसरत) घेतली जाते. (४७)

ड) दंड घेतला जातो. (१७)

३. प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यानुसार १00% पटनोंदणीसाठी मुख्याध्यापक खालील प्रमाणे प्रयत्न करीत होते.

अ) सर्वेक्षण करणे. (प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे) (६६)

ब) पालक भेटी घेणे. (६६)

क) पटनोंदणीसाठी ग्रामशिक्षण समिती सहभाग घेतला जातो. (५४)

ड) मातृप्रबोधन घेतले जाते. (३५)

इ) सांस्कृतिक कार्यक्रमातून समाज प्रबोधन. (२०)

४. अभ्यासात जे विद्यार्थी मागे पडतात त्यासाठी मुख्याध्यापक प्रयत्नशील असून ते खालील प्रमाणे प्रयत्न करीत होते.

अ) जादा तास घेणे. (४७)

ब) स्वयंअध्ययन योजना. (४२)

क) वर्गनायक पद्धतीने अभ्यास पटवून देणे. (६६)

ड) चौकशी करून सहानुभूतीने मार्गदर्शन. (६०)

इ) हुशार विद्यार्थी जोडी लावणे. (४८)

ई) सराव, चाचण्या, प्रभुत्व अध्यापन, उपचारात्मक अध्यापन. (६६)

५. माळशिरस तालुक्यातील शाळांत खालील स्पर्धा परीक्षा उपक्रम राबविले जातात.

| | | |
|---|---|---|
| अ) | स्कॉलरशीप. | १००% |
| ब) | नवोदय. | ८६.८६% |
| क) | सैनिक स्कूल. | १८.१८% |
| ड) | ज्ञान विज्ञान मंडळ. | ३३.३३% |

६. स्पर्धा परीक्षा तयारीसाठी मुख्याध्यापकांचे मते खालील प्रयत्न शाळांमधून केले जातात.

अ) जादा तास आयोजन. (३७)

ब) सराव चाचण्या घेणे. (४२)

क) तालुका स्तरावर विकासमंचा तर्फे शिबिरे आयोजन. (६६)

ड) बाजारातील शैक्षणिक स्पर्धा साहित्याचा सरावासाठी वापर. (६६)

इ) संस्थेच्या स्वाध्यायमाला संच मागविणे व सोडवून घेणे. (५४)

ई) जीवन शिक्षण अंकाचा वापर व दैनिक पेपर वापर. (५७)

७. माळशिरस तालुक्यातील ६ ते १४ वयोगटातील सार्वत्रिक मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याची अंमलबजावणी केली जाते असे ९३.९३% मुख्याध्यापकांचे मत

होते तर या कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही असे ६.०७% मुख्याध्यापकांचे मत होते.

८. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी शिक्षकांना अध्यापनाशिवाय इतर कामे करावी लागत असल्याचे स्पष्ट केले. ती कामे खालील प्रमाणे आहेत.

अ) मतदार यादी बनवणे. (६६)

ब) जनगणना. (६६)

क) कुटूंब नियोजन कार्यक्रम सहभाग. (४२)

ड) निवडणूका पार पाडणे. (६६)

इ) दारिद्र्य रेषेखालील लोकांचे सर्वेक्षण करणे. (६६)

ई) पल्स पोलिओ कार्यक्रमात सहभाग. (६६)

फ) पशुगणना. (३३)

स) अल्पबचत योजना सहभाग. (४९)

ह) ग्राम अभियान सहभाग. (६०)

ळ) साक्षरता अभियानात प्रत्यक्ष सहभाग. (६६)

९. ७५.७५% मुख्याध्यापक स्वत: दिवसातून अध्यापन करण्याचे काम करत होते असे दिसून आले.

१०. २४.२५% मुख्याध्यापकांना अध्यापनाचे काम करावे लागत नाही.

११. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक उपक्रम आयोजित करण्याचे प्रमाण पुढील प्रमाणे होते हे स्पष्ट केले.

अ) हस्ताक्षर स्पर्धा. ९३.९३%

ब) चित्रकला स्पर्धा. १००%

क) रांगोळी स्पर्धा. १००%

ड) वक्तृत्व स्पर्धा. ६३.६३%

इ) विज्ञान उपक्रम स्पर्धा. ६६.६६%

१२. माळशिरस तालुक्यात वर्षातून ६०.६०% मुख्याध्यापक एकवेळा आरोग्य तपासणी करून घेतात. ३६.३६% मुख्याध्यापक वर्षातून दोनवेळा आरोग्य तपासणी करतात. ३.०४% शाळेत केंव्हाही आरोग्य तपासणी केली जात नाही असे स्पष्ट झाले.

१३. प्रतिसादक मुख्याध्यापकांचे विद्यार्थ्यांसाठी सामुदायिक उपक्रम आयोजित करण्याचे प्रमाण पुढील प्रमाणे होते हे स्पष्ट केले.

| | | |
|---|---|---|
| अ) | आवार स्वच्छता. | १००% |
| ब) | सामुदायिक भोजन. | १००% |
| क) | सहल. | ५१.५१% |
| ड) | वनभोजन. | १००% |
| इ) | शालेय बाग तयार करणे. | १५.१५% |
| ई) | बाल दिन साजरा करणे. | १००% |
| फ) | बालिका दिन साजरा करणे. | ७२.७२% |
| स) | राष्ट्रीय सण साजरे करणे. | १००% |

## ६.०७ भौतिक सुविधा व शालेय परिसर याविषयी निष्कर्ष

१. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांच्या इमारतीचे प्रमाण प्रतिसादक मुख्याध्यापकांनी पुढीलप्रमाणे असल्याचे स्पष्ट केले.

| | | |
|---|---|---|
| अ) | पक्की. | ९३.९३% |
| ब) | अर्ध पक्की. | ०.००% |
| क) | कच्ची. | ०.००% |
| ड) | इमारत नाही. | ६.०७% |

२. प्रतिसादक मुख्याध्यापकांनी प्राथमिक शाळांच्या इमारतीची मालकी प्रमाण खालील प्रमाणे होते ते स्पष्ट केले.

| | | |
|---|---|---|
| अ) | जिल्हा परिषद. | ८९.३९% |
| ब) | नगर परिषद. | ०.००% |

क) संस्थेची. ७.५७%

ड) भाडयाने. ३.०४%

३. माळशिरस तालुक्यातील शाळांना पुरेशा वर्गखोल्या उपलब्ध नाहीत.

४. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांना पुरेशा वर्गखोल्या आहेत असे ५१.५१% मुख्याध्यापकांचे मत होते.

५. ४८.४८% मुख्याध्यापकांच्या मते वर्गखोल्या अपू-या आहेत.

६. ३६.३६% प्राथमिक शाळांमध्ये फर्निचर कमी असल्याचे स्पष्ट होते.

७. ६३.६४% शाळेत फर्निचर पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

८. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांत पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेविषयीचे प्रमाण प्रतिसादक मुख्याध्यापकांनी पुढीलप्रमाणे असल्याचे स्पष्ट केले.

अ) हात पंप. ४०.१३%

ब) विहीर. ३.०३%

क) नळ योजना. ५१.५२%

ड) कांहीही सोय नाही. ६.०६%

९. ६.०६% प्राथमिक शाळांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध नाही.

१०. ६३.६४% प्राथमिक शाळांना मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था होती.

११. ३६.३६% प्राथमिक शाळांना मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था नाही.

१२. १२.१२% शाळांत शिक्षकांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था होती.

१३. ८७.८८% शाळांत शिक्षकांसाठी स्वतंत्र खोलीची व्यवस्था नव्हती.

१४. माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शाळांकडे पुढील शैक्षणिक साधनांची उपलब्धता होती.

अ) दूरदर्शन. ६९.७०%

ब) रेडिओ. ९०.९०%

क) टू-इन-वन. ९६.९६%

ड) गणित पेटी. ७५.७५%

इ) पृथ्वी गोल. ८७.८७%

ई) विज्ञान पेटी. ८६.८६%

फ) नकाशे व तक्ते. ९३.९३%

ह) फ्लॅनेल बोर्ड. ९३.९३%

ळ) भूमिती पेटी. ८७.८७%

१५. माळशिरस तालुक्यातील ७८.७९% शाळांना स्वत:चे क्रिडांगणाची सोय आहे.

१६. माळशिरस तालुक्यातील २१.२१% प्राथमिक शाळांकडे स्वत:चे क्रिडांगण आहे.

१७. ३.०३% शाळांना अपूरे क्रिडांगण आहे.

## ६.०८ केंद्रप्रमुखांच्या मुलाखतीद्वारे काढलेले निष्कर्ष.

१. माळशिरस तालुक्यातील ५७.१४% केंद्रप्रमुख पदवीधर प्रशिक्षित असून सायन्स पदवीधर प्रशिक्षित एक होते.

२. २१.४४% पदव्युत्तर प्रशिक्षित असून १४.२८% केंद्रप्रमुख एम.ए.एम.एड् ही पात्रता असलेले होते.

३. समुहातील (केंद्रातील) पटनोंदणी वाढविण्यासाठी केंद्रप्रमुख खालीलप्रमाणे योजना राबवित होते.

अ) पटनोंदणी संदर्भात सर्वेक्षण करणे. १००%

ब) पटनोंदणी अहवाल तयार करणे. १००%

क) शेजारच्या शाळेची सर्वेक्षण पाहणी. ७१.४३%

ड) शाळानिहाय सरासरी उपस्थिती. ५०%

इ) शाळा अर्ध्यातच सोडून जाणा-या विद्यार्थ्यांची माहिती ठेवणे. २८.५७%

ई) पालक सभा घेणे. ६४.२८%

फ) इतर. ०.००%

४. आपल्या केंद्रातील शाळांची गळती रोखण्यासाठी केंदप्रमुख खालील प्रमाणे योजना राबवितात.

अ) शालेय पोषण आहार योजना. १००%

ब) उपस्थिती भत्ता योजना. १००%

क) सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना. १००%

ड) पुस्तके वाटप योजना. ८५.७१%

इ) गणवेश वाटप, लेखन साहित्य. ५०%

५. माळशिरस तालुक्यातील केंद्रप्रमुखांच्या मते ७१.४३% शाळांमध्ये शिक्षक पाठटाचणे काढतात. २८.५७% केंद्रप्रमुखांचे मते प्राथमिक शाळांतील शिक्षक पाठटाचण काढत नाहीत.

६. समुहातील प्राथमिक शाळांचे नियमित उपस्थित राहणा-या शिक्षकांचे प्रमाण केंद्रप्रमुखांच्या मते ६४.२८% आहे. ३५.७२% शिक्षक शाळेत नियमित येतांना आढळत नाहीत.

७. ७८.५८% केंद्रप्रमुख आपल्या समुहातील शाळांना भेटीवेळी दिलेल्या सूचनांच्या नोंदी ठेवतात.

८. २१.४२% केंद्रप्रमुख आपल्या समुहातील शाळांना भेटीच्या वेळी दिलेल्या सुचनांच्या नोंदी ठेवत नाहीत.

९. आपल्या केंद्रातील शाळा तपासणीवेळी मुख्याध्यापक व शिक्षक यांच्या तपासणीनंतर बैठक घेणा-या केंद्रप्रमुखांचे प्रमाण १००% होते.

१०. विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या किमान अध्ययन क्षमतेवरून आपल्या केंद्रातील शाळांच्या शिक्षकांचे मूल्यमापन करणा-या केंद्रप्रमुखांचे प्रमाण ७१.४३% होते. तर २८.५७% केंद्रप्रमुख शिक्षकांचे मूल्यमापन करीत नाहीत.

११. महिन्यातून आपल्या समुहातील शाळांना दोन वेळा भेटी देणा-या केंद्रप्रमुखांचे प्रमाण ७१.४३% होते.

१२. तीन वेळा भेटी देणा-या केंद्रप्रमुखांचे प्रमाण २१.४३% होते.

१३. चार वेळा भेटी देणा-या केंद्रप्रमुखांचे प्रमाण ७.१४% आढळून आले.

१४. आपल्या समुहातील शाळांवर ७८.५८% केंद्रप्रमुख आठवडयातून चार तास अध्यापन करीत होते. तर पाच तास अध्यापन करणारे २१.४२% केंद्रप्रमुख आढळून आले.

१५. भेटीच्या वेळी प्रतिसादक केंद्रप्रमुखांकडून आपल्या समुहातील शाळांच्या शिक्षकांच्या कामाची पडताळणी करणा-या केंद्रप्रमुखांचे प्रमाण पुढील प्रमाणे होते असे आढळून आले.

| | | |
|---|---|---|
| अ) | क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम पूर्ततेबाबत. | १००% |
| ब) | ५ ते ७ चे अध्यापन कार्य (अभ्यासक्रम, नियोजन) | ७८.५८% |
| क) | शैक्षणिक साधनांचा वापर व निर्मिती. | ५७.१४% |
| ड) | विद्यार्थ्यांना झालेले बदल. (मूल्यमापन) | १००% |
| इ) | पटनोंदणी, गळती, स्थगिती इत्यादी. | ८५.७१% |

१६. आपल्या केंद्रातील प्राथमिक शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी केंद्रातील शाळांमध्ये पुढील प्रमाणे केंद्रप्रमुख प्रयत्न करतात. ते प्रमाण खाली दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | मुख्याध्यापक सभा संमेलने. | ५०% |
| ब) | गटसंमेलने. | १००% |
| क) | प्रशिक्षणे (गीतमंच स्पर्धा, क्रिडा, वैयक्तिक) | १००% |
| ड) | कृतिसत्रे, शिबिरे. | ६४.२८% |

**<u>६.०९ शिक्षणविस्तार अधिका-यांच्या मुलाखतीद्वारे काढलेले निष्कर्ष.</u>**

१. माळशिरस तालुक्यात कार्यरत असलेल्या शिक्षण विस्तार अधिका-यांमध्ये १६.६७% शिक्षण विस्तार अधिकारी एस.एस.सी.ज्यू.पी.टी.सी. होते. बी.ए.बी.एड् ३३.३३% होते. बी.एस्सी.एम.एड १६.६७% होते तर बी.एस्सी.बी.एड ३३.३३% आढळून आले.

२. माळशिरस तालुक्यात पदवीधर प्रशिक्षित शिक्षणविस्तार अधिका-यांचे प्रमाण ७३.३३% होते.

३. शिक्षण विस्तार अधिका-यांचा सरासरी अनुभव ७ वर्षाचा होता.

४. ५ वर्षापर्यंत प्रशासनाचा अनुभव असलेल्या शिक्षण विस्तार अधिका-यांचे प्रमाण १६.६७% होते.

५. ७ वर्षापर्यन्त प्रशासनाचा अनुभव असणा-या शिक्षण विस्तार अधिका-यांचे प्रमाण ६६.६६% होते.

६. १० वर्षापर्यन्त प्रशासनाचा अनुभव असणा-या शिक्षण विस्तार अधिका-यांचे प्रमाण १६.६७% होते.

७. शिक्षण विस्तार अधिका-यांना एक बीट साठी ३० शाळांची शैक्षणिक व प्रशासकीय कामे असावीत. बीट अंतर्गत जास्त शाळा असू नयेत.

८. आपल्या बीटमधील शिक्षकांच्या योग्य बदल्याबाबत ६६.६७% शिक्षण विस्तार अधिकारी शिफारस करतात तर ३३.३३% शिक्षण विस्तार अधिकारी शिफारस करत नाहीत.

९. माळशिरस तालुक्यातील १००% शिक्षण विस्तार अधिकारी मुख्यालयात राहतात.

१०. आपल्या बीटमध्ये पुरेसे शिक्षक आहेत असे ६६.६७% शिक्षण विस्तार अधिकारी म्हणतात तर पुरेसे शिक्षक नाहीत असे म्हणणा-यांचे प्रमाण ३३.३३% होते.

११. माळशिरस तालुक्यात प्राथमिक शाळांसाठी पुरेसे शिक्षक नाहीत.

१२. शाळा भेटीवेळी ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांची भेट व चर्चा करणारे ८३.३३% शिक्षण विस्तार अधिकारी आढळून आले. ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांची भेट घेवून चर्चा न करणारे १६.६७% शिक्षण विस्तार अधिकारी होते.

१३. ग्रामशिक्षण समित्यांच्या अध्यक्षांची व सदस्यांची भेट घेवून चर्चा करणा-या शिक्षण विस्तार अधिकारी जास्त आढळून आले.

१४. माळशिरस तालुक्यातील शिक्षण विस्तार अधिकारी समाजाचा शिक्षणामध्ये सहभाग वाढविण्यासाठी खालील प्रयत्न करतात. त्याचे प्रमाण खालील प्रमाणे आढळून आले.

अ) शैक्षणिक उठाव. ६६.६७%

ब) शिक्षक पालक संघ. ५0%

क) बालिका दिन. १00%

ड) सावित्रीबाई दत्तक पालक योजना. १00%

इ) अपंग कल्याण योजना. ३३.३३%

१५. १00% शिक्षण विस्तार अधिकारी गटसंमेलनामध्ये शिक्षकांना मार्गदर्शन करतात असे आढळून आले.

१६. प्रतिसादक शिक्षणविस्तार अधिकारी मासिक गटसंमेलनामध्ये खालील बाबींवर मार्गदर्शन करीत होते.

अ) क्षमता चाचण्या विषयी मार्गदर्शन. (६)

ब) क्षमता चाचण्यांचे मूल्यमापनाविषयी मार्गदर्शन. (६)

क) शासनांची वेळोवेळी येणारी परिपत्रके. (६)

ड) शैक्षणिक साहित्य निर्मिती. (६)

इ) वैज्ञानिक प्रयोग व विज्ञान प्रदर्शनाबाबत. (६)

ई) शासनांच्या विविध योजना व त्याचे उद्दिष्टे व हेतू - मार्गदर्शन. (६)

फ) समाज सहभाग वाढविण्यासाठी विविध मार्ग व उपाय पटनोंदणी, गळती, स्थगिती, दप्तर लिहीणे संभाळणे, दाखले देणे इत्यादी बाबत. (६)

१७. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकारी आपल्या बीटमध्ये वेगवेगळी प्रशासकीय कामे करतात त्याचे प्रमाण खालील प्रमाणे होते.

अ) पेन्शन प्रकरणे. १00%

ब) वसुलीची रकमेबाबत. ५0%

क) शासकीय योजना. ८३.३३%

ड) दिर्घ मुदत रजा. ८३.३३%

इ) शाळा गृह बांधकाम व भाडे १00%

ई) भविष्य निर्वाह निधी. ६६.६७%

फ) शाळा भेटी अहवाल. (आठवडा) १00%

१८. प्रशासकीय कामासोबत इतर जादा कामे दिली जातात ती कामे पुढील प्रमाणे आहेत.

अ) कुटूंब कल्याण. (६)

ब) शाळा बांधकाम माहिती. (६)

क) आरोग्य खाते (पर्यवेक्षण) पल्स पोलिओ व इतर मोहिम. (६)

ड) निवडणूक. (६)

इ) दारिद्रय रेषा गणना. (पर्यवेक्षण)(४)

१९. १00% शिक्षण विस्तार अधिकारी केंद्रप्रमुखांचे गोपनीय अहवाल लिहीतात व आपल्या बीटमधील शिक्षक व मुख्याध्यापक यांच्या केंद्रप्रमुखाने लिहिलेल्या गोपनीय अहवालाचे पुनरावलोकन करतात असे दिसून आले.

२0. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकारी वर्षातून आपल्या बीट मधील शाळांना भेटी देण्याचे प्रमाण खालील प्रमाणे होते.

अ) दोन वेळा ६६.६७%

ब) तीन वेळा ३३.३३%

क) चार वेळा 00.00%

२१. शाळा तपासणीनंतर शिक्षक, मुख्याध्यापक यांची बैठक १00% शिक्षण विस्तार अधिकारी घेतात.

२२. ६६.६७% शिक्षण विस्तार अधिका-यांच्या मते शाळा तपासणीच्या वेळी दिलेल्या सूचनांची कार्यवाही होते. तर ३३.३३% शिक्षण विस्तार अधिका-यांच्या मते होत नाही असे दिसून आले.

२३. माळशिरस तालुक्यातील शिक्षण विस्तार अधिका-यांची प्रशिक्षणे झाली आहेत त्याचे प्रमाण पुढील प्रमाणे होते.

अ) व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्र, पुणे. १६.६६%

ब) शिक्षण विस्तार अधिकारी भूमिका व कार्ये. ५०.००%

क) लोकसंख्या शिक्षण. ३३.३३%

ड) स्मार्ट पी.टी. १००%

२४. प्रतिसादक शिक्षण विस्तार अधिकारी शालेय अभिलेख तपासणी करतांना खालील अभिलेख तपासणी करतात त्याचे प्रमाण पुढील प्रमाणे आहे.

अ) नमूना नंबर एक (प्रवेश रजिस्टर) ६६.६७%

ब) पगार वाटप रजिस्टर. ५०.००%

क) विद्यार्थी दैनंदिन हजेरी रजिस्टर. १००%

ड) परिपत्रक फाईल. ३३.३३%

इ) सूचना वही. ६६.६७%

ई) साहित्य नोंद रजिस्टर. १००%

फ) सादील रजिस्टर. १००%

२५. १००% शिक्षण विस्तार अधिकारी शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचारी यांची खातेनिहाय चाकशी करतात असे आढळून आले.

२६. १००% शिक्षण विस्तार अधिका-यांच्या मते केंद्रपातळीवर एक शिपाई व लेखनिक असावा.

२७. प्रमोशन पेक्षा स्पर्धा परीक्षेतून मुख्याध्यापक भरले जावेत असे ६६.६७% शिक्षण विस्तार अधिका-यांचे मत होते. तर ३३.३३% शिक्षण विस्तार अधिकारी प्रमोशन पद्धतच योग्य आहे असे म्हणताना दिसून आले.

## ६.१० गट शिक्षणाधिका-यांच्या मुलाखतीद्वारे काढलेले निष्कर्ष.

१. तालुक्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांना वेळेवर वेतनवाढ दिली जाते असे मत आहे.

२. तांत्रिक अडचण व कामचुकारपणा आढळून आल्यासच वेतनवाढ दिली जात नाही असे त्यांचे मत आढळले.

३. गट शिक्षणाधिका-यांना शैक्षणिक कामाचा बोजा कमी असतो तर प्रशासकीय कामे जास्त असल्याचे आढळून आले.

४. गट शिक्षणाधिका-यांच्या मते केंद्रीय शाळा/मोठया शाळा भेटीवेळीच सर्व घटकांचे आर्थिक व्यवहार तपासले जातात.

५. महिन्यातून तालुक्यातील २५ शाळांना भेटी देत असल्याचे अढळून आले.

६. आदर्श शिक्षक पुरस्कार व वेतनवाढीसाठी गटशिक्षणाधिकारी चांगले काम करणा-या शिक्षकांचीच शिफारस करतात असे दिसून आले.

७. अनधिकृतपणे गैरहजर राहिलेल्यांना शिक्षा करतात असे आढळते.

८. तालुक्यातील सर्व शाळांत शासनाच्या योजना गटशिक्षणाधिकारी जादा वेळ काढून राबवितात.

९. शिक्षण विस्तार अधिकारी पदे सरळ सेवेतूनच भरावित पण त्यासाठी ठराविक अध्यापनाचा अनुभव मागावा असे मत त्यांनी या पदाच्या भरतीसाठी सांगितले.

१०. प्राथमिक शाळा मान्यता प्रस्ताव एस.एस.सी. बोर्ड मान्यता प्रस्ताव गटशिक्षणाधिका-यांकडे पाठविले जातात असे दिसून आले.

११. गटशिक्षणाधिका-यांना वेगवेगळया बैठकांना हजर रहावे लागते असे दिसून आले.

१२. केंद्रप्रमुख पदे व वेगवेगळी सुट्टीतील प्रशिक्षणे व पहिलीपासून english हे प्राथमिक शिक्षणातील क्रांतिकारी बदल असल्याचे मत मांडले.

## ६.११ प्राथमिक शाळांना दिलेल्या भेटी व निरीक्षणातील निष्कर्ष.

१. माळशिरस तालुक्यातील ३0% प्राथमिक शाळांच्या इमारती सुस्थितीत दिसून आल्या. त्या सर्व इमारती स्लॅबच्या होत्या.

२. ७0% प्राथमिक शाळांच्या इमारतीवर पत्रे होते.

३. २0% प्राथमिक शाळा गावापासून योग्य अंतरावर होत्या.

४. ७०% शाळांना पुरेशा वर्गखोल्या दिसून आल्या.

५. सर्व शाळांना पिण्याच्या पाण्याची सोय वेगवेगळया मार्गाने केलेली दिसून आली.

६. कांही प्राथमिक शाळा हवेशीर वातावरणात दिसून आल्या तरी कंपाऊंड मात्र १०% शाळांनाच दिसून आले.

७. ९२% वर्गखोल्यात वेळापत्रक दिसून आले.

८. अभ्यासक्रम नियोजन, घटक नियोजन व वार्षिक नियोजन करणा-या प्राथमिक शाळांचे प्रमाण ८५% होते.

९. ७०% वर्गखोल्यांना स्वच्छ सूर्यप्रकाश व हवेसाठी खिडक्यांची सोय होती.

१०. ६०% वर्गखोल्या स्वच्छ होत्या.

११. ३०% वर्ग खोल्या कोंदट, पुरेसा सूर्यप्रकाश व हवा न येणा-या आढळून आल्या.

१२. ९५% प्राथमिक शाळांच्या वर्गखोल्यांच्या भिंती बोलक्या होत्या.

१३. २०% शाळांना फर्निचर अपूरे होते.

१४. ७०% शाळांना पुरेसे क्रिडांगण उपलब्ध नव्हते.

१५. ४०% शाळांमधून बागकाम होत नव्हते.

१६. २०% शाळांमधून शिस्तीचा अभाव दिसून आला.

१७. १५% शाळांमधून इमारतीची किरकोळ दुरूस्ती वेळेवर करत नसल्याचे दिसून आले.

१८. ५०% शाळांमधून मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कार्यालय नव्हते.

## विभाग "ब"

## शिफारशी.

### ६.१२ मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक माहिती विषयक शिफारशी.

१. प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापकांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता द्वितीय श्रेणीतील पदवी आणि प्रशिक्षित अशी असावी.

२. अशिक्षित (D.Ed. नसलेल्या) व्यक्तिंची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक करू नये.

३. प्राथमिक शाळांसाठी कायमस्वरूपी मुख्याध्यापकांची नेमणूक करण्यात यावी.

४. प्राथमिक शाळांच्या शिक्षकांना मुख्याध्यापक पदावर कमीत कमी १0 वर्षे सेवा करता यावी.

६.१३ <u>प्राथमिक शाळांच्या माहितीसंबंधी शिफारशी.</u>

१. शहरी भागात प्राथमिक शाळांचे प्रमाण वाढविण्यात यावे.

२. फक्त मुलींसाठी प्राथमिक शाळांचे प्रमाण वाढविण्यात यावे.

३. कनिष्ठ प्राथमिक शाळांचा स्तर वाढवून त्या ठिकाणी वरिष्ठ प्राथमिक शाळा सुरू करण्यात याव्यात.

४. खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जाणा-या प्राथमिक शाळांना शासनाने जास्तीत जास्त मान्यता द्यावी.

५. जादा लोकसंख्या असणा-या शहरात नगरपालिका स्थापून त्या शाळा नगरपालिकांमार्फत चालविल्या जाव्यात.

६. प्राथमिक शाळांमध्ये स्त्री शिक्षकांची संख्या वाढविण्यात यावी.

७. वरिष्ठ प्राथमिक शाळांवर कार्यालयीन कर्मचारी (लिपिक/सेवक) भरण्यात यावे.

६.१४ <u>कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर विषयक शिफारशी.</u>

१. सर्व प्राथमिक शाळांना जिल्हा परिषदेकडून दप्तर पुरविण्यात यावे.

२. सर्व प्राथमिक शाळांमधून गैरहजर राहणा-या मुलांच्या पालकांच्या भेटी घेतल्या जाव्यात.

३. प्राथमिक शाळांतील उशीरा येणा-या शिक्षकांसाठी सर्वच शाळांनी "लेट मस्टर" ठेवावे.

४. सर्व प्राथमिक शाळांमधून वेळेवर उपलब्ध असणा-या सर्व मार्गांनी दुरूस्त्या करून द्याव्यात.

५. ग्रामशिक्षण समितीच्या सर्व बैठकी कार्यविषयक नोंदी सर्व शाळांमधून ठेवल्या जाव्यात.

६. प्राथमिक शाळांना मिळणा-या अनुदानात वाढ करण्यात यावी.

७. सर्व प्राथमिक शाळांमधून सर्व रजिस्टरर्स, फाईल्स उपलब्ध करून त्या लिहिल्या जाव्यात.

८. गुणवत्ता वाढ व शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी शासनाच्या सर्व योजना सर्व शाळांमधून राबविल्या जाव्यात.

## ६.१५ भौतिक सुविधा व शालेय परिसर विषयक शिफारशी.

### प्राथमिक शाळांच्या शिक्षकांविषयी शिफारशी.

१. सर्व प्राथमिक शाळांमध्ये सर्व वर्गासाठी शिक्षक पद निश्चितीनुसार पुरेसे शिक्षक उपलब्ध करून द्यावेत.

२. सर्व पदवीधर मान्यताप्राप्त शाळांना पदवीधर शिक्षक वेळेवर नेमले जावेत.

३. प्राथमिक शाळांतील सर्व मुख्याध्यापकांनी शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण शिक्षकांचे अध्यापन कार्य व विषयाची तयारी या दोन बाबींवर भर देऊन करावे.

४. पाठ निरीक्षणानंतर मुख्याध्यापकांनी त्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी मार्गदर्शन करावे व त्यांना प्रोत्साहन द्यावे.

५. अध्यापन कार्यात कमी पडणाऱ्या सर्व शिक्षकांना सर्व मुख्याध्यापकांनी तोंडी व लेखी सूचना द्याव्यात.

६. सर्व मुख्याध्यापकांनी शिक्षकांसाठी वर्षातून चार ते पाच वेळा नमुना पाठ घ्यावा.

७. दैनंदिन अध्यापनात सर्व शिक्षकांनी शैक्षणिक साधनांचा वापर करावा.

८. नियोजनाप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करण्याची मुख्याध्यापक व शिक्षकांनी प्रयत्नशील रहावे.

९. जे शिक्षक मुख्यालयास रहात नाहीत त्यांचा घरभाडे भत्ता पगारातून कपात केला जावा.

१०. सर्व शिक्षकांनी वेळोवेळीची सर्व प्रशिक्षणे घ्यावीत.

११. प्रशासनाने प्रशिक्षण कालावधी सुट्टीतीलच निवडावा व सर्व मुख्याध्यापकांनी सुट्टीकाळातच शिक्षकांना प्रशिक्षणास सोडावे.

१२. प्रत्येक शाळांमधून विज्ञान प्रयोग केले जातांना विज्ञान प्रयोगाचे सर्व साहित्य वापरले जावे.

## ६.१६ विद्यार्थ्यांविषयी शिफारशी.

१. उशिरा येणा-या विद्यार्थ्यांची उशिरा येण्याची परिस्थिती समजून घेवून योग्य शिक्षा करण्यात यावी.

२. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची १००% पटनोंदणीसाठी मुख्याध्यापक, शिक्षक व समाज यांनी मिळून प्रयत्न करावेत.

३. अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षक, मुख्याध्यापक व समाज यांनी प्रयत्न करावेत.

४. सर्व प्राथमिक शाळांतून वेगवेगळया स्पर्धा परिक्षेसाठी विद्यार्थी बसवून त्यांच्यासाठी जादा वेळ देऊन अध्यापन करावे.

५. ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी मुख्याध्यापकांनी प्राथमिक शिक्षण कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. प्राथमिक शिक्षण कायद्याचा हक्क हा मुलभूत हक्क समजून शिक्षक, मुख्याध्यापक व समाज या सर्वांनी प्रयत्न करावेत.

६. प्राथमिक शाळेतील शिक्षकांना शासनाने अध्ययन अध्यापना शिवाय इतर कोणतीही कामे लावू नयेत.

७. प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांनी दिवसातून दोन तास अध्यापन करावे पण त्यांच्यासाठी त्यांच्या नावावर वर्ग देवू नये.

८. विद्यार्थ्यांसाठी सर्व प्राथमिक शाळातून वेगवेगळे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी राबवावेत. मुख्याध्यापकांनी यासाठी जास्त प्रयत्नशील रहावे.

९. प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांची वर्षातून दोनवेळा आरोग्य तपासणी केली जावी.

## ६.१७ भौतिक सुविधा व शालेय परिसर विषयक शिफारशी.

१. माळशिरस तालुक्यातील सर्वच प्राथमिक शाळांना पक्क्या व स्वतंत्र इमारती असाव्यात.

२. सर्वच प्राथमिक शाळांना पुरेशा वर्गखोल्या असाव्यात.

३. सर्व प्राथमिक शाळांना विद्यार्थी व शिक्षक यांच्या प्रमाणात फर्निचर शासनाने पुरवावे.

४. सर्वच प्राथमिक शाळांना पिण्याच्या पाण्याची सोय करावी. त्यासाठी शासनाने अनुदान द्यावे. त्याचप्रमाणे मुख्याध्यापकांनी ग्रामशिक्षण समिती व गावकरी यांच्यामार्फत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी प्रयत्न करावेत.

५. शासनाने प्रत्येक प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक व शिक्षक यांना स्वतंत्र खोली उपलब्ध करून द्यावी. इतर प्रयत्न म्हणून मुख्याध्यापक व शिक्षक यांनी समाजातील दानशूर व्यक्तिंकडून देणग्या घेवून स्वतंत्र खोली बांधण्यासाठी प्रयत्न करावेत. कारण शासनाला सर्व सोयींसाठी अनुदान देणे शक्य नाही.

६. प्राथमिक शाळांना पुरेशा प्रमाणात शैक्षणिक साधने उपलब्ध करून द्यावीत.

७. सर्वच प्राथमिक शाळांना स्वत:चे क्रिडांगण असावे. त्यासाठी शासनाने जागा उपलब्ध करून द्यावी. मुख्याध्यापक व शिक्षकांनी ग्रामशिक्षण समिती व समाजातील दानशूर व्यक्ति यांच्याकडून क्रिडांगणासाठी जागा मिळविण्याचा प्रयत्न करावा व शक्य त्या मार्गांनी ही समस्या सोडवावी.

<u>६.१८ केंद्रप्रमुखांच्या बाबतीत शिफारशी.</u>

१. समुहातील १00% पटनोंदणी वाढविण्यासाठी केंद्रप्रमुखांनी सर्व उपाय प्रभावीपणे राबवावेत.

२. समुहातील सर्वच शाळांमधून विद्यार्थ्यांची गळती रोखण्यासाठी विविध शासकीय योजना सर्व शाळाप्रमुख व शिक्षक यांच्या मदतीने प्रभावीपणे राबवाव्यात.

३. समुहातील सर्वच शिक्षकांना दररोज पाठटाचण काढण्यासाठी सूचना द्याव्यात. जर सूचना देऊनही शिक्षक पाठ टाचण काढत नसल्यास नियमाप्रमाणे त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी.

४. प्राथमिक शाळांच्या शिक्षकांच्या नियमित उपस्थिती बाबत केंद्रप्रमुखांनी पडताळणी करावी.

५. केंद्रप्रमुखांनी शाळांना भेटी दिल्यानंतर त्यांच्या नोंदी नियमीतपणे स्वतंत्र नोंदवहीत ठेवाव्यत.

६. केंद्रप्रमुखांनी शिक्षकांचे विद्यार्थ्यांनी आत्मसात केलेल्या किमान अध्ययन क्षमातांवरून मूल्यमापन करावे. विद्यार्थ्यांनी कितपत क्षमता आत्मसात केल्या आहेत त्यावरून शिक्षकांचे मूल्यमापन करता येईल.

७. समुहातील प्रत्येक प्राथमिक शाळांना महिन्यातून दोन भेटी केंद्रप्रमुखांनी द्याव्यात. त्यावेळी अध्यापन व अध्ययन कार्य व्यवस्थित कसे चालेल याची काळजी मुख्याध्यापकांशी चर्चा करून घ्यावी.

८. आपल्या समूहातील शाळांमध्ये आठवडयातून चार तास अध्यापन करावे.

९. केंद्रप्रमुखांनी आपल्या समूहातील सर्व शिक्षकांच्या कामाची पडताळणी करावी.

१०. केंद्रप्रमुखांनी समुहातील प्राथमिक शाळांचा दर्जा उंचाविण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापक यांचे सहकार्य घेवून दर्जा सुधारावा व गुणवत्तेत वाढ करावी. विशेषत: माळशिरस तालुक्यात वाडया-वस्त्यावर शाळा, कनिष्ठ शाळा, जास्त प्रमाणात असल्याने अशा शाळांकडे जास्त लक्ष घावे. दर्जा उंचाविण्यासाठी समुहातील शाळांमध्ये वेगवेगळे उपक्रम राबवून घ्यावेत.

## ६-१९ शिक्षण विस्तार अधिकारी संदर्भातील शिफारशी.

१. शिक्षण विस्तार अधिकारी यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता कमीत कमी द्वितीय श्रेणीतील पदवी व प्रशिक्षीत असावा.

२. प्राथमिक शाळेतील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यापेक्षा शिक्षण विस्तार अधिका-यांची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता जास्त असावी.

३. शिक्षण विस्तार अधिका-यांना अध्यापनाचा ७ वर्षाचा अनुभव आहे अशाच व्यक्तिंची नेमणूक करावी.

४. शिक्षण विस्तार अधिका-यांमार्फतच प्राथमिक शिक्षकांच्या बदलीबाबत शिफारस व्हावी. वरिष्ठांनीही शिक्षण विस्तार अधिका-यांची मते जाणून घेवूनच शिक्षकांच्या बदल्या कराव्यात.

५. बीट मधील अपू-या शिक्षकांबाबत वेळोवेळी वरिष्ठांकडे अहवाल पाठवून शिक्षक कमी पडणार नाहीत यासाठी प्रयत्नशील रहावे.

६. सर्वच शिक्षण विस्तार अधिका-यांनी शाळांची भेट व तपासणी वेळी ग्रामशिक्षण समितीच्या अध्यक्षांशी चर्चा करावफी. शैक्षणिक गुणवत्ता वाढ व शैक्षणिक विकास, अडीअडचणी या विषयांवर चर्चा करावी. शाळा ही समाजाचा घटक व समाज परिवर्तनाचे व विकासाचे साधन आहे अशी जाणिव त्यांच्यात निर्माण व्हावी.

७. प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचा विकास करण्यासाठी समाजापर्यन्त पोहोचून समाज सहभाग वाढवावा व त्यासाठी वेगवेगळया योजना तसेच उपक्रम राबवाव्यात.

८. शिक्षक व कर्मचारी यांची कामे शिक्षण विस्तार अधिका-यांनी वेळेत पूर्ण करून त्यांच्या अडीअडचणी वेळेवर पूर्ण कराव्यात. त्याचा सतत पाठपुरावा करावा. विशेषत: प्राथमिक शिक्षकांच्या आर्थिक अडचणी लवकर सोडवाव्यात.

९. शिक्षण विस्तार आधका-यांना प्रशासन सोडून इतर खात्याची कामे देवू नयेत.

१०. केंद्रप्रमुखाचे गोपनीय अभिलेख करताना शिक्षकांचेही गोपनीय अभिलेखांचे वस्तुनिष्ठपणे पुनरावलोकन करावे.

११. शिक्षण विस्तार अधिका-यांनी आपल्या बीट मधील प्रत्येक शाळांची किमान तीन वेळा तपासणी करावी.

१२. सर्व शिक्षण विस्तार अधिका-यांनी शाळा तपासणीनंतर सर्व शिक्षक, मुख्याध्यापक यांची संयुक्त बैठक घेवून त्यांना कमतरतेबाबतच्या सूचना द्याव्यात व मार्गदर्शन करावे.

१३. शिक्षण विस्तार अधिका-यांनी दिलेल्या भेटीवेळी व तपासणीवेळी दिलेल्या सूचनांची कार्यवाही सर्व मुख्याध्यापकांकडून व्हावी व पुढील भेटी वेळी त्याची पडताळणी करून योग्य ती कारवाई करावी.

१४. आपल्या बीट मधील सर्व शाळांचे अभिलेख शिक्षण विस्तार अधिकारी यांनी काळजीपूर्वक पहावेत. ज्या त्रुटी आढळून आल्या आहेत त्याबद्दल मुख्याध्यापकांना

सूचना द्याव्यात, त्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. शाळेचा सादील बाबतही तपासणी करून आर्थिक व्यवहाराची पडताळणी करावी.

## ६.२० गटशिक्षणाधिकारी यांच्या मुलाखतीतील माहितीविषयक शिफारशी.

१. प्राथमिक शाळांतील सर्व शिक्षकांना वेळेवर वेतनवाढी दिल्या जाव्यात.

२. प्रशासकीय कामाबरोबर प्राथमिक शिक्षणाच्या शैक्षणिक बाबींकडेही पुरेसे लक्ष द्यावे.

३. प्राथमिक शिक्षकांच्या निवडीच्या वेळी प्रस्तावाचे वस्तुनिष्ठ पुनरावलोकन करून विस्तार अधिका-यांची मते जाणून घेवून शिफारशी केल्या जाव्यात.

४. अनधिकृतपणे गैरहजर राहिलेल्या शिक्षकांवर कडक कारवाई करावी.

५. सुट्टीतील सर्व प्रशिक्षणे गटशिक्षणाधिका-यांनी नियोजनपूर्वक राबवून घेवून त्याचा हेतू १००% साधावा.

६. वरिष्ठ शाळांचे आर्थिक व्यवहार व शैक्षणिक दर्जा व गुणवत्ता तपासण्याचा प्रयत्न करावा.

## ६.२१ इतर शिफारशी.

१. प्राथमिक शाळांच्या इमारती चांगल्या असाव्यात व सर्वच इमारती स्लॅबच्या असाव्यात.

२. प्राथमिक शाळांच्या इमारती गावापासून दूर व योग्य अंतरावर असाव्यात.

३. सर्व शाळांना कंपाऊंड असावे.

४. सर्व खोल्यांची स्वच्छता केलेली असावी, वायुविजन व प्रकाश व्यवस्था चांगली असावी.

५. सर्व शाळांमध्ये बागकाम घेतले जावे व वृक्षारोपण करून शाळेच्या समोर आवारात शोभा वाढविली जावी. वृक्षारोपणाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देवून प्रत्यक्ष कार्यवाही समाज, ग्रामशिक्षण समिती, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्या मार्फत व्हावे. त्या साठी प्रशासनाकडून वेळोवेळी या सर्व घटकांचे प्रबोधन व्हावे.

## <u>विभाग "क"</u>

शैक्षणिक प्रशासन या विषयाची व्याप्ती संशोधकाच्या मते अतिशय मोठी आहे. ही व्याप्ती कमी करून संशोधकाने हे संशोधन केले आहे. प्रस्तुत संशोधनात संशोधकाने फक्त प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा अभ्यास केला आहे. शिक्षणाच्या वेगवेगळया स्तरांवर प्रशासन काम करते. त्यासाठी त्या सर्व स्तरांवरील प्रशासनाचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधन करताना प्राथमिक सोडून इतर स्तरांचा संशोधकास अभ्यास करणे शक्य झाले नाही. शैक्षणिक क्षेत्रातील प्रशासन प्रभावी होवून शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध स्तरांचा जरूर विचार व्हावा असे संशोधकास वाटते. प्रस्तुत संशोधन करतांना संशोधकास असे काही विषय आढळले की त्यावर पुढील काळात संशोधन करता येईल. ते विषय पुढील प्रमाणे दिलेले आहेत.

१. **<u>माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.</u>**

शिक्षण प्रक्रियेतील प्रशासनाचा आरंभ बाळशिक्षणापासून होतो. बालशिक्षणानंतर प्राथमिक स्तराला महत्व देण्यात येते. प्राथमिक स्तरानंतर माध्यमिक स्तराला शैक्षणिक दृष्टया महत्व देण्यात आलेले आहे. शिक्षण प्रणालीत रोज नवीन प्रयोग घडून येतात. नव्या शोधाबरोबरच नवीन संबोध, संकल्पानांचा उदय होतो. या बदलानुसार माध्यमिक शाळेच्या प्रशासनातही बदल होणे आवश्यक आहे.

आज माध्यमिक शाळा वेगवेगळया प्रशासनाद्वारे चालविल्या जातात. जिल्हा परिषद, खाजगी संस्था, नगरपालिका, ट्रस्ट इ. माध्यमिक शिक्षणाच्या प्रसाराच्या जबाबदा-या पार पाडतात. माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करणा-या जिल्हा परिषद, संस्था, ट्रस्ट, नगरपालिका इत्यादी घटकांच्या प्रशासनात समानता आढळत नाही. शासनाकडून दिल्या जाणा-या अनुदान पद्धतीतही सुसूत्रता नाही. सर्व स्तरांवर शिक्षणाच्या प्रसारासाठी अधिक खर्चाची तरतूद करणे आवश्यक आहे. माध्यमिक शाळांच्या प्रशासनात येणा-या समस्यांचा सखोल अभ्यास करून त्यावर उपाय योजना सूचविणे आवश्यक आहे.

२. <u>कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.</u>

कोठारी आयोगाने १०+२+३ हा आकृतीबंध सांगितल्यानंतर १०+२ स्तरावरील +२ हा स्तर माध्यमिक शाळा किंवा वरिष्ठ महाविद्यालयांना जोडलेला आहे. +२ स्तर ज्याला ११ वी किंवा १२ वी वर्ग जोडलेले आहेत. त्यांना उच्च माध्यमिक किंवा कनिष्ठ महाविद्यालय असे संबोधले जाते.

कांही ठिकाणी माध्यमिक शाळांना व कांही ठिकाणी महाविद्यालयांना हा स्तर जोडल्यामुळे त्यांच्या अम्मलबजावणीत आर्थिक, शैक्षणिक व प्रशासकीय समस्या निर्माण झाल्या. उच्च माध्यमिक हा स्तर जोडून असल्याने माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर अध्ययन अध्यापन पद्धतीत फरक आढळतो. स्तर जोडणीमुळे कांही ठिकाणी उच्च माध्यमिक स्तरांच्या प्रशासनाचे काम मुख्याध्यापक व कांही ठिकाणी महाविद्यालयाचे प्राचार्य पाहतात. त्यामुळे या स्तरावर शैक्षणिक व प्रशासकीय समस्या निर्माण झाल्या आहेत.

उच्च माध्यमिक शाळांचे प्रशासन त्या स्तराला शिकविणाऱ्या शिक्षकांकडे नसल्यामुळे या स्तरावर अनुदान, सेवा शर्ती, तासिका कालावधी, शिक्षकांची वेतनश्रेणी या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

त्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास होणे आवश्यक आहे.

३. <u>वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.</u>

वरिष्ठ महाविद्यालयाचा शिक्षण स्तर हा व्यक्ति विकासासाठी अधिक महत्वाचा आहे. वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण समाज गरजा, आकांक्षा, जीवन यांच्याशी निगडीत झाले पाहिजे. राष्ट्रीय सामाजिक एकात्मता वाढीस लागली पाहिजे. नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी नवीन ज्ञान, भावी गरजा यांचा विचार करून वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्रशासनात येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करून त्या समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपाय शोधणे आवश्यक आहे.

४. <u>तालुक्यातील विनाअनुदान माध्यमिक शाळांच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.</u>

शासन माध्यमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी नवीन शाळांना मान्यता देते. नवीन शाळा चालविणा-या घटकांना अनुदान मिळेपर्यन्त स्वत: शाळा चालवून त्यांचा विकास साधावा लागतो. तोपर्यन्त शासन अनुदान टप्प्याटप्प्याने देते.

या अपु-या अनुदानाप्रमाणे पैसे पुरत नाहीत. आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय समस्या निर्माण होतात. त्यामुळे अशा माध्यमिक शाळांचे प्रशासन कशाप्रकारे चालते व ते चालवितांना कोणकोणत्या समस्या निर्माण होतात त्या समस्या सोडवून त्यावर उपाय शोधणे गरजेचे आहे. म्हणून त्याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

५. <u>निवसी आश्रमशाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास.</u>

आज शासन मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणासाठी व भटक्या जमातीच्या मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी निवासी आश्रमशाळांना मान्यता देते. अशा शाळांना सुरूवातीपासूनच १००% अनुदान असते.

परंतू या शाळा निवासी असल्याने त्या शाळांचे प्रशासन चालविणे मुख्याध्यापकांच्या दृष्टीने तारेवरची कसरतच ठरते. आज समाजामध्ये या भटक्या जमातीच्या मुलांना आपले शिक्षण पूर्ण करता येत नाही. त्यांच्या विकासाचा हेतू आणि तो अंमलबजावणीतील अडचणी जाणून घेऊन त्यावर उपाय शोधणे गरजेचे आहे.

६. <u>साखर शाळेच्या प्रशासन समस्यांचा चिकित्सक अभ्यास.</u>

माळशिरस तालुक्यात ४ साखर कारखाने आहेत. साखर शाळा ह्या ऊस तोडणी कामगारांच्या मुलांच्या स्थलांतरातून त्यांचे शिक्षण करण्यासाठी पुढे आलेली संकल्पना आहे.

ऊस तोडणी कामगारांना त्यांची आर्थिक समस्या सोडविण्यासाठी स्थलांतर करावे लागते. त्यांनी वर्षातून आठ महिने स्थलांतर केल्यामुळे लहान मुलांनाही त्यांच्या बरोबर घेवून जावे लागते.

अशी मुले शिक्षण प्रवाहापासून दूर ठेवून शासनाला फार मोठे नुकसान होईल. कारण ही मुले देशाचे भावी आधारस्तंभ असतात. त्या मुलांच्या अशा शाळा कारखान्याशेजारी भरतात.

या शाळा व त्याचे प्रशासन यांच्या समस्या जाणून घेवून त्या शाळा चालवितांना येणा-या प्रशासन समस्या सोडविण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे शासनाचा हेतू साध्य होईल. त्यासाठी या साखर शाळेच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास होणे आवश्यक आहे.

७. <u>पूर्व प्राथमिक शाळांसाठी स्वतंत्र प्रशासन निर्मितीसंबंधी पाहणी करणे.</u>

प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश घेण्यापूर्वी जे शिक्षण दिले जाते त्याला पूर्व प्राथमिक शिक्षण म्हटले जाते. हे शिक्षण जिल्हा परिषदेमार्फत एकात्मिक बालविकास कार्यक्रम या योजनेद्वारे व खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जाणा-या बालवाडया व आंगणवाडयामार्फत दिले जाते.

या बालवाडया व आंगणवाडयांचे प्रशासन पाहण्यासाठी कोणतीही सक्षम व्यवस्था नाही. त्यामुळे पूर्व प्राथमिक शिक्षणाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. या स्तरावर त्या वर्गाला शिकविणा-या शिक्षकांच्या अनेक समस्या आहेत. तसेच या स्तरावर अनुदान, सेवाशर्ती, तासिका कालावधी, शिक्षकांची वेतनश्रेणी या अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

पूर्व प्राथमिक शिक्षण प्रभावी होण्यासाठी या स्तरासाठी स्वतंत्र प्रशासन व्यवस्था असणे गरजेचे आहे. त्यासाठी पूर्व प्राथमिक स्तरासाठी स्वतंत्र प्रशासन निर्मिती करता येईल का? या संबंधी पाहणी करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर पूर्व प्राथमिक शिक्षणात येणा-या समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

# परिशिष्टे

## परिशिष्ट "अ"

## मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली.

सानप शेषेराव मच्छिंद्र,
एम.ए.एम.एड.
मु.पो.धोत्रे, ता. बार्शी,
जि.सोलापूर.

### विनंती पत्र.

प्रती,

मा.मुख्याध्यापक,
ता. माळशिरस, जि.सोलापूर.

स.न.वि.वि.

मी शिवजी विद्यापीठाच्या एम.फिल.(शिक्षणशास्त्र) या परीक्षेसाठी संशोधनाचे काम करीत आहे. माझा संशोधनाचा विषय "माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यास" हा आहे. शिक्षण महाविद्यालय, बार्शी, जिल्हा सोलापूर येथील प्रा.टी.बी.पाटील, प्रपाठक हे संशोधनास मार्गदर्शन करीत आहेत. कृपया आपण सोबतच्या प्रश्नावलीतील माहिती भरून सहकार्य करावे. सदर प्रश्नावलीचा अभ्यास करून ती भरून पाठविल्याने आपल्या माळशिरस तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रशासनाचा चिकित्सक अभ्यासासाठी बहुमोल मार्गदर्शन मिळणार आहे. सर्व प्राथमिक शाळांना निश्चितच याचा फायदा होणार आहे. सदर संशोधनासाठीची उपयुक्तता आपल्या सर्वांच्या बहुमोल सहकार्यावरच अवलंबून आहे.

या प्रश्नावलीतील माहितीचा उपयोग फक्त संशोधनासाठीच केला जाईल. त्याबाबत गुप्तता राखली जाईल. संशोधनाचे निष्कर्ष आपणास कळवले जातील.

तरी कृपया प्रश्नावली काळजीपूर्वक भरून पंधरा दिवसात परत पाठवावी व मला संशोधन कार्यात सहकार्य करावे, ही विनंती.

आपल्या सहकार्या बद्दल धन्यवाद.

आपला कृपाभिलाषी,

ठिकाण :- माळशिरस.

(एस.एम.सानप)

दिनांक :-

<u>*प्रश्नावली भरण्यासंबंधी सूचना :-*</u>

❖ कांही प्रश्नांच्या समोर प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. आपण सहमत असलेल्या उत्तरावर (√) अशी खूण करा. आपणास हवे असलेले उत्तर पर्यायी उत्तरात न निघाल्यास कृपया इतर या सदराखाली आपले उत्तर लिहावे.

❖ कांही प्रश्न "होय/नाही" स्वरूपाच्या उत्तराची आहेत. तेथे आपणास नको असलेले सदर खोडावे.

❖ ज्या प्रश्नांची कारणे विचारली असतील तेथे ती कारणे स्पष्ट लिहा.

❖ कृपया मोकळया सोडलेल्या जागेत थोडक्यात माहिती द्यावी. जागा अपूरी पडल्यास शेवटी सोडालेल्या रेखांकित जागेत प्रश्न क्र. व उप प्रश्न क्र. लिहून तेथे माहिती लिहावी.

❖ शालेय प्रशासनाच्या दृष्टीने प्रश्नावलीत नसलेली पण आपल्या दृष्टीने महत्वाची वाटत असलेली माहिती शेवटी सोडलेल्या रेखांकित जागेत लिहावी किंवा स्वतंत्र अतिरिक्त कागद जोडावा.

# मुख्याध्यापकांसाठी प्रश्नावली.

## अ) मुख्याध्यापकांची वैयक्तिक माहिती.

१. मुख्याध्यापकांचे संपूर्ण नाव

२. शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता.

३. मुख्याध्यापक पद प्रभारी / कायम.

४. मुख्याध्यापक पदाचा अनुभव.

## ब)शाळेविषयी सर्वसाधारण माहिती.

५. शाळेचे पूर्ण नाव.

६. शाळा शहरी आहे की ग्रामीण. शहरी/ ग्रामीण.

७. शाळेचा प्रकार.
- अ) मुलांची. ☐
- ब) मुलींची. ☐
- क) मुलांची/मुलींची मिश्र. ☐

८. शाळेचा संवर्ग.
- अ) कनिष्ठ प्राथमिक (१ ते ४) ☐
- ब) वरिष्ठ प्राथमिक (१ ते ७) ☐
- क) प्राथमिक व माध्यमिक (१ ते १०) ☐

९. शाळेचे व्यवस्थापन कोणाचे?
- अ) जिल्हा परिषद.
- ब) नगर पालिका.
- क) खाजगी संस्था.
- ड) इतर.

१०. शाळेतील एकूण तुकडयातील विद्यार्थी संख्या

| इयत्ता | १ली. | २ री | ३ री | ४ थी | ५ वी | ६ वी | ७ वी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी संख्या | | | | | | | |

११. शाळेतील स्त्री व पुरूष शिक्षकांची संख्या.
- अ) स्त्री शिक्षिकेची संख्या.
- ब) पुरूष शिक्षकांची संख्या.

१२. कार्यालयीन कर्मचा-यांची संख्या.
अ. लिपिक
ब. सेवक
क. इतर.

१३. कार्यालयीन कामकाजासाठी लिपिक व सेवक यांची गरज (त्या पदाची) तुम्हाला आवश्यक आहे का? होय / नाही.

१४. १ ली ते ४ थी साठी स्त्री शिक्षिका जादा असणे योग्य आहे का ? होय / नाही.

१५. होकार असेल तर का?

१६. आपल्या शाळेचे पात्र(मान्य) पदे किती?

## क) कार्यालयीन कामकाज व शालेय दप्तर.

१७. वर्गशिक्षकांना दप्तर कोण पुरविते :-
अ. जिल्हा परिषद.
ब. शाळा (सादिल मधून)

१८. वर्गशिक्षक विद्यार्थ्यांची दररोज हजेरी घेतात का? होय / नाही.

१९. गैरहजर विद्यार्थ्यांच्या पालकांना कार्यालयात भेटण्यास बोलावले जाते का? होय / नाही.

२०. शिक्षक हजेरीवर महिनाअखेरीस मुख्याध्यापकांची सही घेतात का ? होय / नाही.

२१. लेट येणा-या शिक्षकांसाठी लेटमस्टर ठेवता का? होय / नाही.

२२. वेळापत्रक व वार्षिक नियोजन विहीत नमुन्यात ठेवतात का?
अ. कांहीजण ठेवतात.
ब. सर्वजण ठेवतात.
क. कोणीही ठेवत नाही.

२३. शाळेत येणारी मासिके, पुस्तके, परिपत्रके यांची स्वतंत्र नोंद ठेवता का? होय / नाही.

२४. शाळेत वर्षभरातील केलेल्या किरकोळ दुरूस्तीचा खर्च कशातून करता ?
अ. लोक वर्गणी.
ब. सादील.
क. शैक्षणिक उठाव.
ड. इतर.

| | | |
|---|---|---|
| २५. | तपासणी अधिका-यासाठी 'नोंद वही' (शेरेबुक) ठेवता का? | होय / नाही. |
| २६. | शाळेत आल्यानंतर त्यांच्याकडून दप्तर तपासून तशा वस्तुनिष्ठ सूचना दिल्या जातात का ? | होय / नाही. |
| २७. | दाखला देताना मुख्याध्यापक दाखल्यावरील नोंदी स्वत: तपासतात का? | होय / नाही. |
| २८. | ग्रामशिक्षण समितीच्या अहवालाच्या (कार्य विषयक) नोंदी ठेवता का? | होय / नाही. |
| २९. | शिक्षक पालक संघाची मिटींग अहवालाची नोंद ठेवता का? | होय / नाही. |
| ३०. | शिक्षक व कर्मचारी यांची सेवापुस्तके अद्ययावत आहेत का ? | होय / नाही. |
| ३१. | सादील खर्च याची नोंद ठेवता का ? | होय / नाही. |
| ३२. | शासनाकडून मिळणारा ४% सादील पुरेसा आहे का? | होय / नाही. |

३३. शाळेकडे खालील फाईल/रजिस्टर आहेत का?

| | | |
|---|---|---|
| अ. | प्रवेश अर्ज. | (   ) |
| ब. | शेरेबुक. | (   ) |
| क. | परिपत्रक फाईल. | (   ) |
| ड. | लॉक बुक. | (   ) |
| इ. | हालचाल नोंद वही. | (   ) |
| ई. | आरोग्य तपासणी वही. | (   ) |
| फ. | १९८६ धोरण पुस्तिका. | (   ) |
| ब. | १९९५ क्षमताधिष्ठित अभ्यासपुस्तिका. | (   ) |
| भ. | जीवन शिक्षण अंक. | (   ) |
| म. | इतर. | (   ) |

३४. शासनाच्या प्राथमिक शिक्षण विषयक कोणत्या योजना राबविता ?

| | | |
|---|---|---|
| अ. | गणवेष वाटप. | ( ) |
| ब. | पुस्तक पेढी. | ( ) |
| क. | लेखन साहित्य. | ( ) |
| ड. | उपस्थिती भत्ता. | ( ) |
| इ. | शालेय पोषण आहार. | ( ) |
| ई. | सावित्रीबाई दत्तक पालक योजना. | ( ) |
| प. | अपंग कल्याण योजना. | ( ) |
| फ. | इतर. | ( ) |

## ड) शिक्षकाविषयी.

३५. सर्व वर्गास पुरेसे शिक्षक आहेत का? होय / नाही.

३६. पदवीधर शिक्षक मान्य आहे का? होय / नाही.

३७. शाळेत पदवीधर शिक्षक आहे का? होय / नाही.

३८. शिक्षक घटक नियोजन लिहून दाखवतात का? होय / नाही.

३९. शिक्षक पाठटाचण काढतात का? होय / नाही.

४०. शिक्षकांच्या पाठाचे निरीक्षण करता का? होय / नाही.

४१. एका शिक्षकाचे महिन्यातून किती वेळा पाठ निरीक्षण करता ?
अ. दोन वेळा.
ब. दोन पेक्षा जादा.

४२. पाठ निरीक्षण करताना कोणत्या बाबी लक्षात घेता ?

४३. पाठ निरीक्षणा नंतर सूचना/मार्गदर्शन/प्रशंसा कोणत्याप्रकारे करता?

४४. एका वर्षातून शिक्षकासाठी कितीवेळा नमूना पाठ घेता?

४५. शिक्षक अध्यपनात शैक्षणिक साधनांचा / साहित्याचा वापर करतात का? होय / नाही.

४६. अभ्यासक्रम न पूर्ण झाल्यास कोणते उपाय करता?
अ. जादा तास.
ब. स्वयं अध्ययन.
क. इतर.

४७. सर्व शिक्षक मुख्यालयास राहतात का ? होय / नाही.

४८. शिक्षकांची दरमहा मासिक सभा (गट संमेलन) होते का? होय / नाही.

४९. मासिक गटसंमेलनात कोणकोणत्या बाबींचा आढावा घेतला जातो?

अ. परिपत्रक वाचन. ( )
ब. दैनंदिन अध्यापन. ( )
क. दिग्दर्शित पाठ. ( )
ड. सांस्कृतिक कार्यक्रम. ( )
इ. मार्गदर्शन. ( )
फ. इतर. ( )

५०. शिक्षकांना कोणकोणत्या प्रशिक्षण संधी खात्याकडून उपलब्ध आहेत?

अ. सेवांतर्गत प्रशिक्षण.
ब. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.
क. सेवापूर्व प्रशिक्षण.
ड. सांस्कृतिक/कलाकृती/बाहुलीनाटय प्रशिक्षण
इ. दिल्ली कोर्स. (खेळ, कला)

५१. अशा प्रशिक्षणास शिक्षकांना तुम्ही पाठविता का ? होय / नाही.

५२. शिक्षकांचा प्रशिक्षणास प्रतिसाद कसा आहे? बरा/चांगला/उत्कृष्ट.

५३. शाळा सुरू असताना शिक्षकांना प्रशिक्षण वर्गास पाठविल्यास काय परिणाम होतात?

५४. विज्ञान साहित्य,प्रयोगशाळा यांचा वापर शिक्षक करतात का? होयं / नाही.

### इ) विद्यार्थ्यांविषयी.

५५. उशिरा येणा-या विद्यार्थ्यास शिक्षा करता का? होय / नाही.

५६. शिक्षा करीत असल्यास कोणत्या प्रकारची शिक्षा करता ?

५७. १00% पटनोंदणीसाठी काय करता?

५८. अभ्यासात मागे पडलेल्या विद्यार्थ्यांसाठी काय करता?

५९. विद्यार्थ्यामध्ये आवड निर्माण (शिक्षणाची) होण्यासाठी कोणते उपक्रम राबविता ?

६०. शाळेच्या गुणवत्ता विकासासाठी कोणते प्रयत्न करता ?

६१. शाळेमध्ये कोणकोणत्या स्पर्धा परिक्षासाठी मार्गदर्शन व नियोजन केले जाते?

| | | |
|---|---|---|
| अ. | स्कॉलरशिप | (    ) |
| ब. | ज्ञानविज्ञान मंडळ | (    ) |
| क. | नवोदय विद्यालय | (    ) |
| ड. | सैनिक स्कूल | (    ) |
| इ. | इतर | (    ) |

६२. या परिक्षेच्या तयारीसाठी शाळेद्वारे कोणकोणते प्रयत्न करता?

६३. सहा ते चौदा वयोगटातील मुलांच्या सार्वत्रिक, मोफत व सक्तिच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची अंमलबजावणी करता का? होय / नाही.

६४. शालेय कामे सोडून अवांतर कोणकोणती कामे शिक्षकांना करावी लागतात.

६५. मुख्याध्यापकांना पूर्णवेळ अध्यापनाचे काम करावे लागते का? होय / नाही.

६६. मुख्याध्यापक दिवसातून किती तास अध्यापन करतात ? एक/दोन/तीन.

६७. विद्यार्थ्यासाठी खालील पैकी कोणते वैयक्तिक उपक्रम घेता ?

| | | |
|---|---|---|
| अ. | हस्ताक्षर स्पर्धा | (    ) |
| ब. | चित्रकला स्पर्धा | (    ) |
| क. | रांगोळी स्पर्धा | (    ) |
| ड. | वक्तृत्व स्पर्धा | (    ) |
| इ. | विज्ञान उपक्रम निर्मिती स्पर्धा | (    ) |
| ई. | इतर उपक्रम | (    ) |

६८. विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून किती वेळा करण्यात येते.

६९. विद्यार्थ्यांद्वारे खालीलपैकी कोणते उपक्रम राबविता ?

| | | |
|---|---|---|
| अ. | आवार स्वच्छता. | (    ) |
| ब. | सामुदायिक भोजन. | (    ) |
| क. | सहल. | (    ) |
| ड. | वनभोजन. | (    ) |
| इ. | शालेय बाग तयार करणे. | (    ) |
| ई. | बाल दिन. | (    ) |
| प. | बालिका दिन. | (    ) |
| भ. | इतर. | (    ) |

## ई) भौतिक सुविधा व शालेय परिसर.

७०. शालेय इमारत प्रकार.

| | | |
|---|---|---|
| अ. | पक्की. | (    ) |
| ब. | अर्धी पक्की. | (    ) |
| क. | कच्ची. | (    ) |
| ड. | टिन शेड. | (    ) |
| इ. | इमारत नाही. | (    ) |

७१. शालेय इमारत खालील पैकी कोणाची आहे ?

| | | |
|---|---|---|
| अ. | जिल्हा परिषद. | (    ) |
| ब. | नगर पालिका. | (    ) |
| क. | संस्थेची. | (    ) |
| ड. | भाडयाने. | (    ) |
| इ. | इतर. | (    ) |

७२. वर्गखोल्या पुरेशा आहेत काय ? होय / नाही.

७३. शाळेत पुरेसे फर्निचर आहे का ? होय / नाही.
बाक/डेस्क/टेबल/खुर्ची

७४. पिण्याच्या पाण्याची सोय कशी केली जाते?

| | | |
|---|---|---|
| अ. | हात पंप | (    ) |
| ब. | विहीर | (    ) |
| क. | नळ योजना | (    ) |
| ड. | सोय नाही | (    ) |

७५. मुख्याध्यापक ऑफिस आहे का ? होय / नाही.

७६. शिक्षक स्टाफ रूम आहे का ? होय / नाही.

७७. शाळेकडे खालीलपैकी कोणती शैक्षणिक साधने उपलब्ध आहेत ?

अ. दूरदर्शन संच.

ब. रेडिओ.

क. टेप रेकॉर्डर.

ड. गणित पेटी.

इ. भूमिती पेटी.

ई. पृथ्वी गोल.

प. नकाशे (जिल्हा/राज्य/देश/शेजारी/जग)

फ. विज्ञान पेटी.

ब. फ्लॅनेल बोर्ड.

भ. खेळाची साधने (नेट/रिंग/इतर)

म. इतर.

७८. शाळेस स्वत:चे क्रिडांगण आहे का? होय / नाही.

सोबत दिलेल्या प्रश्नावली खेरीज या संशोधनाच्या दृष्टीने कांही मुद्दे सुचवावयाचे असतील तर खालील दिलेल्या को-या कागदावर द्यावेत.

## परिशिष्ट "ब"

### प्रतिसादक मुख्याध्यापकांची प्राथमिक शाळांच्या नावासह नावें .

| अ . क्र | मुख्याध्यापकाचे नाव . | शाळेचे नाव . | गावाचे नाव . |
|---|---|---|---|
| १ . | श्री . गुरव रामचंद्र विश्वनाथ . | जि . प . शाळा . | कोंडबावी . |
| २ . | श्री . पवार सुभाष नारायण . | जि . प . केंद्रशाळा . | आनंदनगर . |
| ३ . | सौ . नसिरबी नुरहसन सय्यद . | शं . मोहीते प्रशाला . | शंकरनगर . |
| ४ . | श्री . जगन्नाथ नामदेव पिसे . | जि . प . शाळा . | पिलिव . |
| ५ . | श्री . सुरवसे लक्ष्मण धोंडीराम . | जि . प . शाळा . (मुले) | पिलिव . |
| ६ . | श्री . पाटील मारूती सुबराव . | जि . प . शाळा . | कदमवस्ती (कोंडबावी) |
| ७ . | सौ . कांबळे ग . द . | जि . प . शाळा . | पुरंदावडे . |
| ८ . | श्री . सावंतराव दगडू धोंडीबा . | जि . प . शाळा . | डोंबाळवाडी (खुडूस) |
| ९ . | श्री . काळे हरी नारायण . | भाऊसो राऊत विद्यामंदीर . | दत्तनगर (खंडाळी) |
| १० . | श्री . कुंभार रामचंद्र दशरथ . | जि . प . शाळा . | कोळेगाव (वाघमोडे वस्ती) |
| ११ . | श्री . थोरात वसंत सदाशीव . | जि . प . शाळा . | खोरेवस्ती . |
| १२ . | श्री . चोपडे पांडुरंग जगन्नाथ . | जि . प . शाळा . | दसूर . |
| १३ . | श्री . मुल्ला गनिमियाँ बाबुमियाँ | जि . प . केंद्रशाळा . | धर्मपूरी . |
| १४ . | सौ . पाठक मंगला पंडित . | जि . प . केंद्रशाळा . | सदाशिवनगर . |
| १५ . | श्री . धुमाळ बबन लक्ष्मण . | जि . प . शाळा . | चाकोरे . |
| १६ . | श्री . कांदळे दादा लिंबा . | जि . प . शाळा . | विजयवाडी . |
| १७ . | श्री . लोखंडे मारूती आबा . | जि . प . शाळा . | कोळेगाव . |
| १८ . | श्री . रणनवरे भानुदास कृष्णा . | जि . प . शाळा . | माणकी . |
| १९ . | श्री . जवळेकर बाळकृष्ण श्रीधर | जि . प . शाळा . | उघडेवाडी . |
| २० . | श्री . तांबोळकर नरसिंह शंकर . | जि . प . शाळा . | भांबुर्डी . |
| २१ . | श्री . कांबळे शिवाजी श्रावण . | जि . प . शाळा . | बोंडले . |
| २२ . | श्री . खुडे हरिश्चंद्र चांगदेव . | जि . प . शाळा . | धानोरे . |
| २३ . | श्री . शेख बशीर अल्लाउद्दीन . | जि . प . शाळा . | मोरोची . |

| अ.क्र | मुख्याध्यापकाचे नाव. | शाळेचे नाव. | गावाचे नाव. |
|---|---|---|---|
| २४. | श्री.रणनवरे तानाजी दिगंबर. | जि.प.शाळा. | जळभावी. |
| २५. | श्री.घाडगे रा.ज. | जि.प.शाळा. | शेरी नं.१ |
| २६. | श्री.माळी भिमसेन बिराप्पा. | जि.प.केंद्रशाळा. | मारकडवाडी. |
| २७. | श्री.फोके जगन्नाथ चांगदेव. | जि.प.शाळा. | फळवणी. |
| २८. | श्री.शहाणे दशरथ हरीभाऊ. | जि.प.शाळा. मुले/मुली. | दत्तनगर अकलूज. |
| २९. | श्री.राऊत प्रभाकर शंकर. | जि.प.केंद्रशाळा. | माळशिरस. |
| ३०. | श्री.घोडके छा.ज. | जि.प.मुलामुलींची शाळा. | भाकरेवाडी. |
| ३१. | श्री.घाडगे रंगनाथ बळीराम. | जि.प.शाळा. | फोंडशिरस. |
| ३२. | श्री.साळवे मारूती तातु. | जि.प.केंद्रशाळा. | यशवंतनगर. |
| ३३. | श्री.कोरे दत्तात्रय चतुर्भूज. | जि.प.शाळा. | विझोरी. |
| ३४. | श्री.भांबुरे शिवदास आबा. | जि.प.शाळा. | एकशिव. |
| ३५. | सौ.सोरटे सुमन पांडुरंग. | जि.प.शाळा. | दहिगांव. |
| ३६. | श्री.फुले संभाजी उत्तम. | जि.प.शाळा. | पिरळे. |
| ३७. | श्री.अवघडे वसंत लक्ष्मण. | जि.प.केंद्रशाळा. | कळंबोली. |
| ३८. | श्री.खताळ चंद्रकांत धोंडीराम. | महर्षि शंकरराव मो.प्रशाला. | यशवंतनगर. |
| ३९. | सौ.कुलकर्णी मृणालिनी गोविंद | पाठशाळा. | शिवपुरी. |
| ४०. | श्री.भोसले महादेव. | पाठशाळा. | चंद्रपुरी. |
| ४१. | श्री.कसबे संपत्ती रामा. | पाठशाळा. | सिनपुरी. |
| ४२. | श्री.केरबु जिलानी चमन. | जि.प.शाळा.मुले. | वेळापूर. |
| ४३. | सौ.तरटे व.अं. | जि.प.शाळा. | मगरवाडी. |
| ४४. | श्री.काळेल बा.रा. | जि.प.शाळा. | फळवणी. |
| ४५. | श्री.जाधव पा.म. | जि.प.शाळा.मुली. | वेळापूर. |
| ४६. | श्री.गुळवे. | जि.प.शाळा. | चव्हाणवाडी. |
| ४७. | श्री.जाधव चु.ना. | जि.प.शाळा. | खुडूस. |
| ४८. | श्री.मगर अ.कृ. | जि.प.शाळा. | निमगाव. |

| अ.क्र | मुख्याध्यापकाचे नाव. | शाळेचे नाव. | गावाचे नाव. |
|---|---|---|---|
| ४९. | श्री.बांगर क.च. | जि.प.शाळा. | विझोरी. |
| ५०. | श्री.सावंत अ.दा. | जि.प.शाळा. | माळेवाडी (अकलूज) |
| ५१. | श्री.लंके र.द. | जि.प.शाळा. | मेडद. |
| ५२. | श्रीमती.कस्तुरे श.द. | जि.प.शाळा. | सदाशिवनगर. |
| ५३. | श्री.बडवे ग.धो. | जि.प.शाळा. | लोणंद. |
| ५४. | श्री.कथले म.शी. | जि.प.शाळा. | मोहितेवाडी. |
| ५५. | श्री.कदम वि.म. | जि.प.शाळा. | पळसमंडळ. |
| ५६. | श्री.सावंत स.चा. | जि.प.शाळा. | मांडवे. |
| ५७. | श्री.देशपांडे न.व. | जि.प.शाळा. | बोराटेवस्ती. |
| ५८. | श्री.गेजगे आ.बा. | जि.प.शाळा. | नातेपुते नं.२ |
| ५९. | श्री.करडे पां.दा. | जि.प.शाळा. | सुळेवाडी. |
| ६०. | श्री.गारे चं.द. | जि.प.शाळा.मुले. | पिलिव. |
| ६१. | श्री.गोडसे च.वि. | जि.प.शाळा. | कोळेगांव. |
| ६२. | श्री.काटमोरे वि.अ. | जि.प.शाळा. | तरंगफळ. |
| ६३. | श्री.शेटे ना.व. | जि.प.शाळा. | चांदापुरी. |
| ६४. | श्री.मगर वि.पां. | जि.प.शाळा. | गारवाड. |
| ६५. | श्री.अवेकर प्र.ज. | जि.प.शाळा. | मळोली. |
| ६६. | श्री.जोशी वा.रा. | जि.प.शाळा. | तांदुळवाडी. |

## परिशिष्ट "क"

## केंद्रप्रमुखांची प्रश्नावली.

१. केंद्रप्रमुखांचे नाव :-

२. मुख्यालयाचा पत्ता :-

३. शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता :-

४. प्राथमिक शाळेतील पट नोंदणी वाढविण्यासाठी कोणत्या योजना राबविता ?

५. प्राथमिक शाळांतील गळती रोखण्यासाठी कोणत्या योजना राबविता ?

६. शिक्षक पाठटाचण काढतात का?

७. शिक्षक नियमित शाळेत येतात याची पडताळणी करता काय ?

८. शाळांन भेटी दिल्यानंतर दिलेल्या सूचनांची नोंद स्वतंत्र वहीत ठेवता काय?

९. शाळा तपासणी नंतर शिक्षक, मुख्याध्यापक यांच्याशी चर्चा करता काय ?

१०. विद्यार्थ्यांची किमान अध्ययन क्षमतावरील प्रभुत्वाची चाचणी घेवून प्रत्येक शिक्षकाचे मूल्यमापन करता काय ?

११. समूहातील शाळांना महिन्यातून किती भेटी देता?

१२. आठवडयातून किती तास अध्यापन करता ?

१३. पूर्व नियोजित भेटीच्या वेळी शिक्षकांची कोणती कामे पडताळून पाहता ?

१४. प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचाविण्यासाठी शिक्षकांसाठी कोणते उपक्रम घडवून आणता ?

१५. ग्राम शिक्षण समितीच्या महिन्यातून समूहातील किती शाळांच्या मिटींगसाठी हजर राहता ?

१६. १00% पट नोंदणीसाठी काय करता ?

१७. समूहातील शिक्षकांकडून सहकार्य मिळते का ?

१८. वरिष्ठ अधिका-यांकडून अपेक्षित सहकार्य मिळते का ?

१९. केंद्रप्रमुख पद निर्मितीचा शासनाचा हेतू त्याबद्दल तुमचे मत काय ?

२०. शासनाने दिलेली या पदासाठीची कामे कोणती ? या कामात कोणता अपेक्षित बदल करावयास हवा ?

टीप :- ही प्रश्नावली भरताना रिकाम्या जागेतच उत्तरे लिहावित.

## परिशिष्ट "ड"

## शिक्षण विस्तार अधिकारी यांना प्रश्नसूची.

१. संपूर्ण नाव :-

२. शैक्षणिक लायकी :-

३. अध्यापनाचा अनुभव :-

४. प्रशासनाचा एकूण अनुभव :-

५. बीट किती केंद्रांचे असावे :-

६. प्रशासन सोडून इतर कोणती कामे सोपविली जातात ?

७. कोणकोणत्या राष्ट्रीय कामात सहभागी होता ?

८. हेडक्वार्टरला राहता काय ?

९. आठवड्यातून दोन दिवस ऑफिसला हजेरी देणे योग्य वाटते काय? (प्रशासनाच्या दृष्टीकोनातून)

१०. सादील खर्चाबाबत तपासणी शाळा भेटीच्या वेळी करता काय ?

११. किती विद्यार्थ्यांमध्ये एक शिक्षक नेमावा असे तुम्हास वाटते ?

१२. गट संमेलनास हजर राहता काय ?

१३. प्रमोशन घेवून शिक्षण विस्तार अधिकारी ५०% खाते भरते व निम्मे परीक्षेतून हा नियम योग्य आहे का ? त्या बद्दल तुमचे मत कोणते ?

१४. मुख्याध्यापक पदे ५०% प्रमोशन व ५०% स्पर्धा परीक्षेतून भरली जावीत का ?

१५. तुम्ही प्रशासनात आल्यापासून कोणकोणत्या प्रकारची प्रशिक्षणे घेतली?

१६. बीटमध्ये किती प्राथमिक शाळा आहेत ? व तुमच्या मते किती असाव्यात ?

१७. शिक्षकांच्या बदल्याबाबत योग्य शिफारस करता काय ?

१८. सर्व प्राथमिक शाळांसाठी पुरेसे शिक्षक आहेत काय ?

१९. समाजाचा शिक्षणामध्ये सहभाग वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करता ?

२०. गटसंमेलनात शिक्षकांना मार्गदर्शन करता काय ?

२१. करीत असल्यास कोणत्या स्वरूपाचे मार्गदर्शन करता ?

२२. आपण कोणाचे गोपनीय अभिलेख भरता ?

२३. प्रत्येक शाळांची वर्षभरातून किती वेळा तपासणी करता व भेटी देता ?

२४. शाळा तपासणीनंतर शिक्षकांची एकत्र बैठक घेता काय ?

२५. शाळा तपासणीनंतर दिलेल्या सूचनांची कार्यवाही होते काय ?

२६. शालेय अभिलेख तपासणीच्या वेळी कोणकोणते अभिलेख पाहता?

२७. शिक्षक, मुख्याध्यापक व इतर कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी झाल्यास आपणामार्फत होते काय ?

टीप :- रिकाम्या जागेतच प्रश्नांची उत्तरे भरावीत.

## परिशिष्ट "इ"

## गटशिक्षणाधिकारी यांच्यासाठी प्रश्नसूची.

*टीप :- रिकाम्या जागेतच प्रश्नाची उत्तरे भरावीत.*

१. अ) संपूर्ण नाव :-

ब) शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता :-

क) अनुभव :-

२. प्राथमिक शिक्षकांना वेळेवर वेतनवाढ दिली जाते काय ?

३. गटशिक्षणाधिकारी म्हणून कोणती कामे करता ?

४. माळशिरस तालुक्यात शासनाच्या कोणकोणत्या योजना राबविल्या जातात ?

५. केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक, मुख्याध्यापक यांचा आर्थिक व्यवहार तपासता काय ?

६. अमान्य शाळेवर कायदेशीर कारवाई केली जाते काय ?

७. तालुक्यातील प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी व शिक्षणाची राष्ट्रीय उद्दिष्टे साध्यतेसाठी इतर कोणकोणत्या योजना राबविता ?

८. महिनाभरात आपण किती शाळांना भेटी देता ?

९. आदर्श शिक्षकांच्या निवडीसाठी शिफारस करता काय ?

१०. शिक्षक अनधिकृतपणे अनुपस्थित असल्यास काय करता ?

११. वर्षात जि.प.च्या ५ शाळांची वार्षिक तपासणी करावी या मर्यादेपेक्षा जादा मर्यादा असावी

का ? होय असल्यास किती ?

१२. प्राथमिक शाळा मान्यता प्रस्ताव आपलेकडे सादर केले जातात काय ?

१३. स्पर्धा परीक्षा उपक्रम (शिष्यवृत्ती, नवोदय, सैनिक स्कूल) यासाठी वर्षभरात कोणकोणते प्रयत्न करता ?

१४. ५०% शिक्षण विस्तार अधिकारी प्रमोशनने भरतात. त्याबद्दल शासनाची कार्यवाही योग्य वाटते का ? तुमचे मत मांडा.

१५. शासनाने प्राथमिक शिक्षणात केंद्रप्रमुख हे पद निर्माण केले ते पद शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी आहे त्या पदाच्या कामाचा आणि शासनाचा हेतू यांचा समन्वय साधला जातो का?

१६. मुख्याध्यापक पद सिनियारीटीप्रमाणे भरणे योग्य वाटते का ?

१७. आपणास कोणकोणत्या बैठकीस उपस्थित रहावे लागते ?

१८. एका बीटमध्ये किती शाळा असाव्यात? या तालुक्यात एका बीटमध्ये किती शाळा आहेत ?

टीप :- गटशिक्षणाधिकारी या नात्याने प्राथमिक शाळेच्या प्रशासनासंबंधी अजून कांही माहिती योग्य वाटल्यास खालील जागेत नमूद करावी.

## परिशिष्ट "ई"

### प्रतिसादक केंद्रप्रमुखांची नावें- कार्यालयीन पत्त्यासह.

| अ.क्र | केंद्रप्रमुखांचे नाव. | शाळेचे नाव. | गावाचे नाव. |
|---|---|---|---|
| १. | श्री.म.रा.बोत्रे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | खुडूस. |
| २. | श्री.क.भा.कोतमिरे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | मोहितेवाडी. |
| ३. | श्री.गो.आ.भरते. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | नातेपुते. |
| ४. | श्री.ग.भु.हाळे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | धर्मपुरी. |
| ५. | श्रीमती.ज.आ.पाठक. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | दहिगाव. |
| ६. | श्री.ब.आ.शेख. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | मोरोची. |
| ७. | श्री.भि.वी.माळी. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | मारकडवाडी. |
| ८. | श्री.इ.धो.भोसले. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | फोंडशिरस. |
| ९. | श्री.सु.भि.कुलकर्णी. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | इस्लामपूर. |
| १०. | श्रीमती.रे.भ.देशपांडे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | सदाशिवनगर. |
| ११. | श्रीमती.ला.अ.मुलाणी. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | माळशिरस. |
| १२. | श्री.मा.वि.कोळी. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | चांदापुरी. |
| १३. | श्री.वि.म.पाटील. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | कळंबोली. |
| १४. | श्री.गु.भि.खुरंगुळे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | शिंदेवाडी. |
| १५. | श्री.कु.र.पठाण. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | माळशिरस कन्या. |
| १६. | श्री.म.भ.भंडारे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | अकलूज. |
| १७. | श्री.व.श्री.मगर. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | यशवंतनगर. |
| १८. | श्रीमती.हे.र.सरताळे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | आनंदनगर. |
| १९. | श्री.भि.ल.गायकवाड. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | संगम. |
| २०. | श्री.द.तु.पोखरे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | बोरगांव. |
| २१. | श्री.मो.कृ.माळी. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | नेवरे. |
| २२. | श्री.र.ई.शेख. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | महाळूंग. |
| २३. | श्री.श.शं.लाडे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | बोंडले. |
| २४. | श्री.बा.श.राजुरकर. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | वेळापूर. |
| २५. | श्री.व.रा.सोनार. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | तांदुळवाडी. |
| २६. | श्री.ग.वा.दिवटे. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | कोळेगांव. |
| २७. | श्री.श.ना.जाधव. | जि.प.कें.प्राथमिक शाळा. | पिलिव. |

## परिशिष्ट "फ"

### गटशिक्षणाधिकारी व शिक्षण विस्तार अधिकारी यांची नावे.

| अ. | केंद्रप्रमुखांचे नाव. | पदनाम. | शाळेचे नाव. | गावाचे नाव. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. पाटील राजेंद्र गोविंद. | गटशिक्षणाधिकारी | पंचायत समिती. | माळशिरस. |
| २ | श्री. देशमुख धनंजय हरिश्चंद्र. | विस्तार अधिकारी | जि. प. प्रा. शाळा | नातेपुते. |
| ३ | श्री. काळुंगे दत्तात्रय ज्ञानेश्वर. | विस्तार अधिकारी | जि. प. प्रा. शाळा | पिलिव. |
| ४ | श्री. पांढरे बजीरंग दादा. | विस्तार अधिकारी | जि. प. प्रा. शाळा | वेळापूर. |
| ५ | श्री. मुल्ला अरिफ नूरमहंमद. | विस्तार अधिकारी | जि. प. प्रा. शाळा | दहिगांव. |
| ६ | श्री. नकाते महालिंग दत्तात्रय. | विस्तार अधिकारी | जि. प. प्रा. शाळा | अकलूज. |
| ७ | श्रीमती. शिंगटे ल. म. | विस्तार अधिकारी | जि. प. प्रा. शाळा | माळशिरस. |

## परिशिष्ट "ग"
## भेटी दिलेल्या शाळांची नावे.

| अ.क्र | शाळेचे नाव. | गावाचे नाव. |
|---|---|---|
| १. | जि.प.प्राथमिक शाळा. | एकशिव. |
| २. | जि.प.प्राथमिक शाळा. | कळंबोली. |
| ३. | जि.प.प्राथमिक शाळा. | पिरळे. |
| ४. | जि.प.प्राथमिक शाळा. | बांगर्डे. |
| ५. | पाठशाळा (शेती महामंडळ) | शिवपूरी. |
| ६. | पाठशाळा (शेती महामंडळ) | झिनपूरी. |
| ७. | पाठशाळा (शेती महामंडळ) | चंद्रपूरी. |
| ८. | जि.प.प्राथमिक शाळा. | दहिगांव. |
| ९. | जि.प.प्राथमिक शाळा. | गुरसाळे. |
| १०. | जि.प.प्राथमिक शाळा. | धर्मपूरी. |
| ११. | जि.प.प्राथमिक शाळा. | मोरोची. |
| १२. | जि.प.प्राथमिक शाळा. | शिंदेवाडी. |
| १३. | जि.प.प्राथमिक शाळा. | नातेपुते. |
| १४. | जि.प.प्राथमिक शाळा. | सदाशिवनगर. |
| १५. | जि.प.प्राथमिक शाळा. | फोंडशिरस. |
| १६. | जि.प.प्राथमिक शाळा. | माळशिरस कन्या. |
| १७. | जि.प.प्राथमिक शाळा. | माळशिरस मुले. |
| १८. | जि.प.प्राथमिक शाळा. | बोराटेवस्ती. |
| १९. | जि.प.प्राथमिक शाळा. | पुरंदावडे. |
| २०. | जि.प.प्राथमिक शाळा. | मेडद. |
| २१. | जि.प.प्राथमिक शाळा. | कुरभावी. |
| २२. | जि.प.प्राथमिक शाळा. | चव्हाणवाडी. |
| २३. | जि.प.प्राथमिक शाळा. | पाठकवस्ती. |
| २४. | जि.प.प्राथमिक शाळा. | कोथळे. |
| २५. | जि.प.प्राथमिक शाळा. | खुडूस मुले. |

# संदर्भ ग्रंथ सूची

## मराठी.


| अ.क्र. | लेखकाचे नाव. | पुस्तक/प्रकाशनाचे नाव. |
|---|---|---|
| १. | श्री.अकोलकर ग.वि.<br>श्री.पाटणकर ना.वि. | शालेय व्यवस्था व प्रशासन.<br>पुणे निळकंठ प्रकाशन, पुणे.१९८९<br>पृ.क्र.१२ ते १६. |
| २. | डॉ.दुनाखे अरविंद | शालेय व्यवस्थापन, प्रशासन व संघटन.<br>पृ.क्र.२७ ते ३४. |
| ३. | श्री.जोशी प्र.न. | आदर्श मराठी शब्दकोष भाग - १<br>विदर्भ मराठा बुक कंपनी, पुणे.<br>पृ.क्र. ३९ |
| ४. | सौ.स्नेहप्रभा जोशी.<br>श्री.आंबेकर नि.शा. | अधुनिक भारतीय शिक्षण.<br>पुणे सुविचार मंडळ, १९८९.<br>पृ.क्र.८0 ते १२५. |
| ५. | श्री.ताम्हणकर एस.डी. | शैक्षणिक प्रशासन व नियोजन.<br>नूतन प्रकाशन, पुणे, १९७६.<br>पृ.क्र.१२१, १२२. |
| ६. | डॉ.न.रा.पारसनीस. | स्वातंत्र्योत्तर भारतीय शिक्षण.<br>नूतन प्रकाशन, पुणे, डिसें.१९९४.<br>पृ.क्र. ९८, ९९ |
| ७. | श्रीमती.पाटील लिला. | आजचे शिक्षण आजच्या समस्या.<br>श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८५.<br>पृ.क्र.३0, ३१, ९८. |
| ८. | श्री.बनहट्टी श्री.ना.<br>श्री.धर्माधिकारी भाऊ. | सुगम मराठी शब्दकोश.<br>सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६८.<br>पृ.क्र.१६६ |
| ९. | श्री.मुळे रा.शं.<br>श्री.उमाटे वि.तु. | शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे.<br>महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, नागपूर, |

| | | |
|---|---|---|
| १०. | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. | संशोधन संपदा.<br>नानपुरे व.रा. शिक्षणशास्त्र संस्था.<br>रौप्य महोत्सवी वर्ष प्रकाशन (१९६४-१९८९) पुणे ३०.<br>पृष्ठ क्र. ३२ ते ३४. |
| ११. | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. | प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम.<br>शिक्षण व सेवायोजन विभाग.<br>५ मे १९८९. |
| १२. | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. | जीवन शिक्षण अंक.<br>महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.<br>पृ.क्र.६ ते १४. |
| १३. | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. | जीवन शिक्षण अंक.<br>डिसेंबर १९९५.<br>पृ.क्र.६, ७, ८. |
| १४. | श्री.वाजरे रा.वि.<br>श्री.नानकर, श्री.द.हे.लावणे,<br>श्री.चं.बा.पुराणिक. | शालेय व्यवस्थापन,<br>नूतन प्रकाशन, पुणे, १९८९<br>पृ.क्र १८ ते ३५ |
| १५. | शालेय शिक्षण ग्रंथालय विभाग. | प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आणि साक्षरता कार्यक्रम.<br>शालेय शिक्षण ग्रंथालय विभाग, मुंबई ३२. |

# संदर्भ ग्रंथ सूची

## English.


| Sr.No. | Name of Author. | Publication. |
|---|---|---|
| 1. | Aggarwal I.C. | Educational Administration of school organization and supervision, Arya Book Depot, New Delhi – 1967 |
| 2. | Best John W. | Research in Education, 4th Edition, Prentic Hall of India, New Delhi – 1982 |
| 3. | Buch M.B. | A survey of research in Education, Center of Advanced Study in Education and psychology, M.S.University, Baroda – 1974 |
| 4. | Buch M.B. | Second survey of research in Education, Society of Educational Research and Development, Baroda - 1979 |
| 5. | Buch M.B. | Third Survey of research in Education, N.C.E.R.T., New Delhi – 1986 |
| 6. | Buch M.B. | Fourth Survey of research in Education, Vol – I, N.C.E.R.T., New Delhi – 1991 |
| 7. | Buch M.B. | Fourth Survey of research in Education, Vol – II, N.C.E.R.T., New Delhi – 1991 |
| 8. | Deo Pratibha | Educational Research in University of Bombay, Bombay University – 1981 |
| 9. | Govt. of India. | Report of Education Commission. 1964 – 1966 |
| 10. | Patole N.K. | Educational Research in Universities in Maharashtra, S.T.College, Bombay – 1982 |